रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २९०
www.ramprahar.com
◆ शनिवार, ९ मे २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

‘जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर पूर्ण करा’/२
खालापूरमध्ये ग्रामस्थांच्या सतर्कतेने बालविवाह थांबला!/५
महाराष्ट्र टेनिस क्रिकेट चॅम्पियन्स लीगचा शुभारंभ/८

## सुवेंदू अधिकारी होणार प. बंगालचे नवे सीएम, आज शपथविधी



**कोलकाता :** पश्चिम बंगालमध्ये भाजपकडून सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग आला आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (दि.८) कोलकातामध्ये झालेल्या भाजप विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत नवे मुख्यमंत्री म्हणून सुवेंदू अधिकारी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले. ते शनिवारी (दि.९) सकाळी ११ वाजता मुख्यमंत्रिपदाची शपथ घेणार आहेत. कोलकाता येथील ऐतिहासिक ब्रिगेड परेड ग्राऊंडवर होणाऱ्या या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, बडे नेते उपस्थित राहणार आहेत. विधानसभा निवडणुकीत सुवेंदू अधिकारी यांनी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांचा पराभव केला. भवानीपूर या ममतांच्या बालेकिल्ल्यातच अधिकारी यांनी त्यांना धूळ चारली, ज्याचे बक्षीस त्यांना मिळाले आहे.

### दहावीचा निकाल ९२.०९ टक्के; मुलींची सरशी

# कोकण विभागाचे वर्चस्व

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे फेब्रुवारी–मार्चमध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल ९२.०९ टक्के इतका लागला आहे. दरवर्षीप्रमाणे मुलींनी निकालात बाजी मारली आहे. राज्यात कोकण विभागातून सर्वाधिक ९७.६२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



या परीक्षेसाठी राज्यातून एकूण १५,५५,०२६ नियमित विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १५,४२,४७२ प्रविष्ट झाले, तर १४,२०,४८६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. मुलींच्या उत्तीर्णतेची टक्केवारी ९४.९६, तर मुलांची ८९.५६ आहे. म्हणजेच मुलींची टक्केवारी ५.४०ने जास्त आहे.

राज्यातून सहा हजार ६१२ शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. एकूण ६४ विषयांपैकी २० विषयांचा निकाल १००% टक्के लागला आहे. सर्वात उल्लेखनीय बाब म्हणजे राज्यातील १७९ विद्यार्थ्यांनी १००पैकी १०० गुण मिळवले आहेत.

**विभागनिहाय निकाल** (टक्केवारी)

| | |
|---|---|
| कोकण | ९७.६२ |
| कोल्हापूर | ९५.४७ |
| मुंबई | ९४.९७ |
| पुणे | ९४.२४ |
| नाशिक | ९०.५३ |
| अमरावती | ९०.५० |
| नागपूर | ८९.०७ |
| लातूर | ८८.४२ |
| छ. संभाजीनगर | ८८.४१ |

## रायगडची उज्ज्वल यशाची परंपरा

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्याचा दहावीच्या परीक्षेचा निकाल ९५.०३ टक्के लागला आहे. बारावीप्रमाणेच दहावीच्या निकालात यंदाही मुलींनी बाजी मारली. जिल्ह्यात ९६.४४ टक्के मुली, तर ९३.७० टक्के मुले पास झाली आहेत.

दहावीच्या परीक्षेसाठी जिल्ह्यातून ३५ हजार ४७५ विद्यार्थ्यांनी अर्ज भरले होते. त्यापैकी ३५ हजार २१७ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला उपस्थित होते. यामधील ३३ हजार ४६९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. जिल्ह्यात सर्वात जास्त ९७.६२ टक्के निकाल पोलादपूर तालुक्याचा लागला असून सर्वात कमी ८६.२९ टक्के निकाल तळा तालुक्याचा लागला आहे.

जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, उपाध्यक्ष मधुकर पाटील, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारूद्र नाळे यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**तालुकानिहाय निकाल (टक्केवारी)**

पोलादपूर ९७.६२, महाड ९६.९६, कर्जत ९६.९१, म्हसळा ९३.०६, पनवेल ९५.९४, अलिबाग ९५.३५, उरण ९४.८९, मुरूड ९४.५९, माणगाव ९४.५०, रोहा ९४.३५, पेण ९३.७५, खालापूर व श्रीवर्धन प्रत्येकी ९२.१४, सुधागड ८९.९८, तळा ८६.२९.

## एमएनएम विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या पनवेल तालुक्यातील गव्हाण कोपर येथील मोरू नारायण म्हात्रे (एमएनएम) विद्यालयाचा दहावीच्या परीक्षेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. विद्यालयातील परीक्षेस प्रविष्ट झालेले सर्व १५९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

पार्थ कुंडलिक लाडे याने ९१.४% गुण प्राप्त करीत एमएनएम विद्यालयातून प्रथम क्रमांक मिळवला. अंतरा किरण पाटील (९१.२%) हिने द्वितीय, तर दिव्या जितेंद्र योगीने (९०.४%) तृतीय क्रमांक प्राप्त केला. एकूण प्रविष्ट १५९ विद्यार्थ्यांपैकी ६१ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, ६४ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी, ३३ विद्यार्थ्यांनी द्वितीय श्रेणी आणि एका विद्यार्थ्याने उत्तीर्ण श्रेणी प्राप्त केली आहे. (पान २ वर..)

# समाजात एकता अन् प्रगतीसाठी महान व्यक्तींच्या कार्याचा आदर्श महत्त्वाचा -लोकनेते रामशेठ ठाकूर

### थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध कार्यक्रम



(अधिक छाया पान ८ वर..)

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

कर्मवीर अण्णा, एन. डी. पाटील, दि. बा. पाटील, जनार्दन भगतसाहेब या सर्वांनी समाजहिताच्या दृष्टिकोनातून प्रचंड मेहनत घेतली. त्यांच्या कार्याचा व विचारांचा वारसा पुढील पिढीला दिला पाहिजे आणि त्याच मार्गाने वाटचाल केली पाहिजे. त्यातून समाजात एकता, प्रगती आणि जनकल्याणाची भावना अधिक दृढ होईल, असे प्रतिपादन थोर दानशूर व्यक्तिमत्त्व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उलवे नोड येथे केले.

कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते, थोर समाजसुधारक स्व. जनार्दन आत्माराम भगत यांच्या ३८व्या पुण्यतिथीनिमित्ताने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या संस्था आणि व्यक्तींचा गुणगौरव, नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार तसेच पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२६" पारितोषिक वितरण समारंभ गुरुवारी (दि.७) सायंकाळी उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर भव्य स्वरूपात व समारंभपूर्वक लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

### चित्रफीत प्रदर्शित, डॉक्युमेंटरीचे अनावरण

या कार्यक्रमात स्व. जनार्दन भगतसाहेबांच्या जीवनावरील आढावा घेणारी चित्रफीत प्रदर्शित करण्यात आली तसेच लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या अर्थात अमृतमहोत्सवी वर्ष वाढदिवसानिमित्त त्यांच्या जीवनावर निर्मिती करण्यात आलेल्या ‘रामपर्व’ या डॉक्युमेंटरीचे अनावरण पुत्र आमदार प्रशांत ठाकूर आणि नगरसेवक परेश ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास प्रमुख मान्यवर म्हणून भगतसाहेबांच्या कन्या व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, महापौर नितीन पाटील, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अरुणशेठ भगत, ‘दिबा’साहेबांचे पुत्र अतुल पाटील, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे सचिव नगरसेवक परेश ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, ज्येष्ठ नेते जयंत पगडे, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी. गडदे, संचालक अनिल भगत, प्रकाश भगत, संजय भगत, अजय भगत, रत्नप्रभा घरत, भाऊशेठ पाटील, वसंत पाटील, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, पनवेल महापालिकेचे सभागृहनेते प्रकाश बिनेदार, अ‍ॅड. राहुल घरत यांसह इतर मान्यवर आणि असंख्य नागरिक उपस्थित होते. (पान २ वर..)

## निवडक

### तमिळनाडूत ‘टीव्हीके’च्या सत्तास्थापनेचा मार्ग मोकळा


**चेन्नई :** तमिळनाडू विधानसभा निवडणुकीत जोसेफ विजय यांचा टीव्हीके पक्ष १०८ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरला आहे, मात्र या पक्षाला निवडणुकीत ११८ बहुमताचा आकडा गाठता आलेला नव्हता. दरम्यान, आता तमिळनाडूमध्ये सीपीआय, सीपीआय (एम) आणि व्हीसीके हे पक्ष विजयच्या टीव्हीके पक्षाला पाठिंबा देण्याच्या तयारीत असल्याची बाब समोर आली आहे. त्यानंतर विजय हे शनिवारी (दि.९) सीएमपदाची शपथ घेतील.

### नवरदेवाचा बूट आणि नवरीची चप्पल लपवल्याने लग्नात राडा

**जालना :** नवरदेवाचा बूट आणि नवरीची चप्पल लपवल्याने वधू आणि वर पक्षात भर लग्न मंडपात राडा झाल्याची घटना जालना जिल्ह्याच्या अंबड तालुक्यातील नांदी गावात घडली आहे. लग्नातील राड्याचा व्हिडीओ समोर आला आहे. नवरीच्या काकाने नवरदेवाच्या भावास ठोसा मारल्याने वाद विकोपाला गेला होता. या प्रकरणी वधूकडील १४ जणांवर अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## आकुर्ली येथे मंदिरांचे भूमिपूजन





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील आकुर्ली येथे नियोजित हनुमान मंदिर व श्री विठ्ठल–रुक्मिणी मंदिराचा पायाभरणी सोहळा भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर आणि राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुक्रवारी (दि.८) भक्तिमय वातावरणात झाला.

या कार्यक्रमास पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, अनुसूचित जाती मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष आनंद ढवळे, आकुर्ली ग्रामपंचायतीचे सरपंच भारती सचिन पाटील, उपसरपंच नितीन धरणेकर, विचुंबे सरपंच प्रमोद भिंगारकर, प्रकाश भगत, विनय अग्रवाल, किशोर चौधरी, यतीन पाटील, निलेश म्हात्रे, प्रदीप भोपी, पद्माकर महाराज पाटील, विश्वजित पाटील यांच्यासह इतर मान्यवर, ग्रामस्थ आणि भाविक उपस्थित होते.

या मंदिरांमुळे परिसरातील धार्मिक व सांस्कृतिक वातावरण अधिक समृद्ध होणार असून ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## टीसीएस प्रकरणातील मास्टरमाईंड निदा खानला बेड्या


### ११ मेपर्यंत पोलीस कोठडी

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

टीसीएस कंपनीतील लैंगिक शोषण व धर्मांतर प्रकरणातील सूत्रधार निदा खान हिला गुरुवारी रात्री छत्रपती संभाजीनगरमधून अटक करण्यात आली. न्यायालयाने तिला ११ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.



टीसीएस प्रकरण उघड झाल्यानंतर निदा खानने नाशिक न्यायालयात अटकपूर्व जामिनासाठी अर्ज केला होता, परंतु न्यायालयाने तिचा अर्ज फेटाळला. गर्भवती असल्याचे कारण देत तिने पुन्हा एकदा जामिनासाठी प्रयत्न केला होता, मात्र तिला अटकपूर्व जामीन मंजूर झाला नाही. ती अनेक दिवस पोलिसांना गुंगारा देत होती. अखेर तिला अटक करण्यात आली. निदाला लपण्यासाठी मदत करीत असल्याच्या आरोपाखाली छत्रपती संभाजीनगरचे एमआयएम पक्षाचे नगरसेवक मतिन पटेल यांच्यावरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत.




# पनवेलची वाहतूक कोंडी सोडवण्यासाठी पाहणी

### महापौर नितीन पाटील यांचा पोलीस, मनपा अधिकाऱ्यांसोबत दौरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल शहरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी शुक्रवारी (दि.८) महापौर नितीन पाटील यांनी शहर वाहतूक शाखेचे प्रमुख औदुंबर पाटील यांच्यासह प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून 'फील्ड अ‍ॅक्शन मोड'मध्ये पाहणी केली.



शहरातील वाढत्या ट्रॅफिक समस्यांवर तातडीने तोडगा काढण्यासाठी लोकप्रतिनिधी आणि पोलीस प्रशासनाने संयुक्तपणे हा पाहणी दौरा केला. या दौऱ्यादरम्यान शहरातील सर्व महत्त्वाच्या आणि वर्दळीच्या ट्रॅफिक पॉइंट्सची बारकाईने पाहणी करण्यात आली. वाहतूक कोंडी होणारी नेमकी ठिकाणे आणि त्यामागची कारणे शोधून त्यावर आवश्यक ठिकाणी तातडीने निर्णय घेण्यात आले.

महापौर नितीन पाटील यांनी काही संवेदनशील ठिकाणी तत्काळ उपाययोजना सुरू करण्याचे निर्देश महापालिका प्रशासनाला दिले आहेत. पनवेलमधील नागरिकांचा प्रवास सुखकर व्हावा आणि वाहतूक कोंडीची समस्या कायमस्वरूपी कमी व्हावी यासाठी ठोस पावले उचलली जात असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या पाहणी दौऱ्यात महापौर नितीन पाटील यांच्यासोबत नगरसेविका दर्शना भोईर, नगरसेवक सुमित झुंजारराव, अमित ओझे, रूपेश नागवेकर, शहर अभियंता संजय कटेकर तसेच महापालिकेचे संबंधित अधिकारी आणि वाहतूक पोलीस दलाचे कर्मचारी उपस्थित होते. महापालिका आणि पोलीस प्रशासनाच्या या संयुक्त पुढाकारामुळे पनवेलकरांना लवकरच वाहतूक कोंडीतून दिलासा मिळेल, अशी आशा व्यक्त करण्यात येत आहे.

## विरार–अलिबाग कॉरिडॉरला प्रशासकीय मान्यता; खर्चासही मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाने मुंबई महानगर प्रदेशाचा चेहरामोहरा बदलून टाकण्याची क्षमता असलेल्या महत्त्वाकांक्षी अशा विरार–अलिबाग बहुउद्देशीय मर्गिका प्रकल्पाच्या (मल्टी–मोडल ट्रान्सपोर्ट कॉरिडॉर) पहिल्या टप्प्याला प्रशासकीय मान्यता दिली. नगरविकास विभागाने काढलेल्या शासन निर्णयानुसार या १४ पदरी आणि नियंत्रित प्रवेश असलेल्या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यासाठी तब्बल ३१,७९३.४७ कोटी रुपयांच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली आहे.

प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यांतर्गत वसई तालुक्यातील नवघर ते पेण तालुक्यातील बळवली असा ९६.४१ किलोमीटर लांबीचा रस्ता विकसित केला जाणार आहे. या महामार्गामुळे मुंबई आणि उपनगरातील सध्याच्या रस्त्यांवरील वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होईल. सर्वात महत्त्वाचे म्हणजे या प्रवासामध्ये प्रवाशांचा जवळपास ९० मिनिटांचा वेळ वाचणार आहे.

# एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारणाची कामे युद्धपातळीवर पूर्ण करा -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



## भूजल पातळी वाढविण्यासाठी कामे करण्याचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

एल निनोच्या पार्श्वभूमीवर जलसंधारण तसेच जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गतची कामे युद्धपातळीवर पूर्ण करण्यात यावीत. तसेच भूजल पातळी कमी झालेल्या ठिकाणी प्राधान्याने कामे करून तेथील भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रयत्न करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी वर्षा या शासकीय निवासस्थानी मृद व जलसंधारण विभागाचा आढावा घेतला. यावेळी मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, मृद व जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, मुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मुख्यमंत्र्यांचे जल –विषयक सल्लागार श्रीराम वेदिरे, विशेष कार्य अधिकारी प्रिया खान, मृद व जलसंधारण आयुक्त अंजली रमेश, महाराष्ट्र जलसंधारण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजय देवराज आदी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, एल निनोच्या पार्श्वभूमीवर भूजल पातळी वाढविणे आवश्यक आहे. त्यासाठी जलसंधारण, जलयुक्त शिवारमधील कामांचे प्राधान्य ठरवून ती पूर्ण करण्यात यावीत. तसेच जलयुक्त शिवार २.० अंतर्गत समाविष्ट गावांमध्ये दुरुस्तींच्या कामांची निकड पाहून ही कामे आराखड्यात समाविष्ट करून तातडीने पूर्ण करावीत. जलयुक्तमधील राज्यस्तरीय आराखडे १५ मे पूर्वी मंजूर करण्यात यावेत. तसेच जिल्ह्यांना सुधारित आराखडे देऊन कामांना गती द्यावी. जलयुक्त शिवारची कामे हाती घेतलेल्या गावांबाहेरील १० टक्के कामेही प्राधान्यक्रम ठरवून हाती घेण्यात यावीत.

केंद्र शासनाच्या 'विकसित भारत जी राम जी' योजनेमध्ये जलसंधारणाच्या कामांवर भर देण्यात आला आहे. त्याचा लाभ घेऊन राज्यातील जलसंधारणाची कामे पूर्ण करून घ्यावीत. जलसंधारण कामाअंतर्गत नालाखोलीकरणची कामे करताना त्याठिकाणी पुन्हा गाळ होऊ नये, यासाठी नाल्याच्या ठिकाणी बांबू लागवड करण्याचा विचार करावा. विदर्भातील मालगुजारी तलावांच्या दुरुस्तीची कामे जून महिन्यात पूर्ण करण्याचे नियोजन करावे. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेअंतर्गत वाढीव निधी मिळण्यासाठी केंद्रीय मंत्री यांना स्वतः भेटणार असल्याचेही मुख्यमंत्री यांनी यावेळी सांगितले.

सचिव पापळकर यांनी सांगितले की, जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत विशेष निधी व अभिसरणअंतर्गत आतापर्यंत गाव आराखड्याप्रमाणे १ लाख ४४ हजार ६९७ कामे मंजूर झाली आहेत. त्यापैकी १ लाख १० हजार १२० कामे पूर्ण झाली आहेत.

## सिडकोकडून अनधिकृत बांधकामे, अतिक्रमणांविरोधात व्यापक कारवाई

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

आगामी महत्त्वाकांक्षी प्रकल्पांसाठी मार्ग मोकळा करण्याच्या उद्देशाने सिडकोकडून अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात व्यापक कारवाई मागील दोन वर्षांच्या कालावधीत सिडकोतर्फे सुमारे ११० हेक्टर क्षेत्रावरील ५,८०४ अनधिकृत बांधकामे वअतिक्रमणे निष्कासित करण्यात आली आहेत.

मागील दोन वर्षांत सिडकोने ११० हेक्टर जमिनीवरील ५,८०४ अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणेयशस्वीरित्या निष्कासित करून मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणमुक्त केली आहे. अतिक्रमण मुक्त झालेली हीजमीन सिडकोच्या महत्त्वाकांक्षी आगामी प्रकल्पांसाठी मोलाची ठरणार आहे.

"सार्वजनिक जमिनींचे संरक्षण करणे तसेच नवी मुंबईचा जागतिक दर्जाच्या नियोजित शहर म्हणून विकास करणे, यासाठी सिडको कटिबद्ध आहे. अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांविरोधात राबविण्यात आलेलीव्यापक कारवाई ही बेकायदेशीर अतिक्रमणांविरोधातील सिडकोची ठाम भूमिका अधोरेखित करते.

नैना क्षेत्रामध्येही संपूर्ण परिसराचा नियोजित विकास सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने मोठ्या प्रमाणावरनोटिसा बजावण्यात आल्या असून निष्कासन मोहिमा राबविण्यात आल्या. तसेच अनधिकृत जाहिरातफलक हटविण्याची कारवाई करण्यात आली असून त्यामुळे विस्तारित नवी मुंबई परिसरातील शिस्तबद्ध वनियोजित विकासाला अधिक बळ प्राप्त झाले आहे.

अतिक्रमणमुक्त करण्यात आलेली ही जमीन केवळ आकाराने जास्त नसून एरोसिटी, एज्युकेशन सिटी,मेडिसिटी, लॉजिस्टिक पार्क, एंटरटेनमेंट अरेना आदी महत्त्वपूर्ण प्रकल्पांच्या उभारणीच्या दृष्टीने उपलब्धझालेली संधी आहे. सिडकोची भूसंपदा सुरक्षित ठेवण्यासाठी तसेच ही जमीन नागरिकांच्या व्यापक हितासाठी अशा मोहिमा पुढेही अधिक तीव्रतेने राबविण्यात येतील, अशी माहिती सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी दिली.

# सर्वसामान्य जनतेच्या समस्या निराकरण करणारे गतिमान सरकार -आमदार रविशेठ पाटील

**पेण : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनखाली राज्यात सर्वत राबविले जात असून सर्वसामान्य जनतेच्या समस्यांचे निराकरण करणारे हे गतिमान सरकार असल्याचे प्रतिपादन आमदार रविशेठ पाटील यांनी पेणमध्ये आयोजित शिबिरात केले.





पेणमधील नागरिकांसाठी सार्वजनिक विद्यामंदिर येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उदघाट्न आमदार रविशेठ पाटील व माजी खासदार धैर्यशिल पाटील, नगराध्यक्ष प्रितम पाटील यांच्या उपस्थितीत्त करण्यात आले. या कार्यक्रमास पी.डी. पाटील, तहसिलदार तानाजी शेजाळ, नायब तहसिलदार प्रसाद कालेकर, नायब तहसीलदार नितीन परदेशी, नगरसेवक निळकंठ म्हात्रे, नगरसेवक आनंद जाधव,नगरसेवक पल्लवी कालेकर, नगरसेवक अजय क्षिरसागर, नगरसेवक संगीता लाड, अफ्रिन अखवारे,नगरसेवक प्रविण पाटील, मालतीताई म्हात्रे, राजिप सदस्य जनार्दन भस्मा, डी. बी. पाटील, साकव संस्थेचे अध्यक्ष अरुण शिवकर, समाजसेवक हरिष बेकावडे आदींसह मंडळ अधिकारी, तलाठी उपस्थित होते.

आमदार रविशेठ पाटील यांनी सांगितले कि, पूर्वी एक दाखल्यासाठी तहसील कार्यालय, तलाठी कार्यालय या ठिकाणी अनेक चकरा माराव्या लागत होत्या परंतु केंद्र सरकारच्या माध्यमातून राज्य सरकारने हे अभियान राबवून सामान्य जनतेला हे दाखले सहज उपलब्ध करून देण्याचे काम केले आहे.

यावेळी माजी खासदार धैर्यशिल पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज्यांच्या काळात महाराजांनी दीनदुबळ्यांना, शेतकऱ्यांना जमिनी दिल्या, बैल जोड्या दिल्या, वेळप्रसंगी कर्ज माफ केले असे शेतकरी हितांचे निर्णय घेऊन राज्य हे कल्याणकारी असले पाहिजे हि भूमिका जगासमोर ठेवली त्याच्याच पावलावर पाऊल ठेवत राज्यातील देवेंद्रजी फडणवीस सरकार सर्वसामान्य जनता, शेतकरी वर्गाच्या हिताचे निर्णय घेऊन प्रशासन आपल्या दारी या माध्यमातून नागरिकांना विवीध जातीचे दाखले उपलब्ध करून देण्याचे काम करीत आहे त्याचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे ते म्हणाले.

नगराध्यक्ष प्रितम पाटील यांनी सांगितले कि, हा कार्यक्रम महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून संपूर्ण राज्यभरात तसेच पेणमध्ये राबविला जात असून लोकांचा त्रास कमी व्हावा यासाठी शासन एक पाऊल पुढे आले आणि शासन आपल्या दारी येऊन आपल्याला या वेगवेगळ्या सोयीसुविधा देत आहे म्हणूनच दारी आलेल्या आपल्या या शासनाच्या सोयीसुविधा या सगळ्या सोयी सुविधांचा लाभ आपण घेणं हे आपलं कर्तव्य आहे, पुढे बोलताना त्यांनी युद्धजन्य परिस्थितीत इतर देशांनी आणीबाणी जाहीर केली,पेट्रोल डिझेलचे भाव वाढले पण आपला देश असा आहे की दोन महिने झाले या युद्ध परिस्थितीत सुद्धा आपल्या देशात सगळ्या सोयी सुविधा या व्यवस्थेत मिळत आहेत गॅसच्या बाबतीत मागच्या काळात विरोधकांनी काही अफवा पसरवलेल्या पण हे भाजप प्रणित सरकामुळेच देशाचा प्रत्येक माणूस सुरक्षित राहील त्याला सर्व सुविधा मिळतील.

## सुरळीत पाणीपुरवठ्याची लव्हेज ग्रामस्थांची मागणी



**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपालिका हद्दीतील लव्हेज व परिसरातील भागात अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने ग्रामस्थांनी काल नगरपालिका कार्यालयात पाणीपुरवठा अधिकारी अविनाश भोईर यांच्या कार्यालयात धडक देऊन सुरळीत पाणीपुरवठ्याची मागणी केली.

पाणीपुरवठा अधिकारी अविनाश भोईर यांनी तांत्रिक अडचण असल्याचे सांगून आठ दिवसाची मुदत मागून घेतली आहे. तरी ग्रामस्थांचे समाधान झाले नाही. प्रशासनाने तातडीने पुरेसा पाणीपुरवठा करावा अशी बैठकीत जोरदार मागणी करण्यात आली.

ग्रामस्थ नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांना याबाबतचे निवेदन देण्यासाठी आले होते मात्र नगराध्यक्ष तातडीच्या कामासाठी कोकण भवन येथे गेल्याचे यावेळी अधिकाऱ्यांनी सांगितले.

सातत्याने लव्हेज गावात पाण्याची समस्या असल्याने आमदार महेंद्र थोरवे यांनी या गावासाठी पाणीपुरवठा योजनेसाठी विशेष आर्थिक निधीची तरतूद केली होती, त्यानुसार नवीन पाईपलाईन टाकण्यात आले तरीही गावाला पाण्याच्या समस्येला आजही सामोरे जावे लागत आहे. या गावाच्या परिसरात मोठ्या प्रमाणात नवीन इमारती होत असल्याने त्यांना मोठ्या प्रमाणात नवीन नळ जोडणी देण्यात असल्याचे धक्कादायक माहिती समोर येत आहे.

यावेळी नगरसेवक नरेश पालंडे, किशोर पाटील, समीर शिंदे, संतोष मुंडे, रुपेश म्हात्रे, चंद्रकांत पिंगळे, प्रकाश पाटील, काशिनाथ पाटील, पांडुरंग चितळकर, अरुण पाटील, राजेश पाटील, संदीप पाटील, सोपान पाटील, निलेश ठरकुडे इत्यादी सह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

या संदर्भात उपनगराध्यक्ष व पाणीपुरवठा सभापती विक्रम साबळे यांनी खोपोली शहराला पुरेसा पाणीपुरवठा देणे ही प्रशासनाची व लोकप्रतिनिधीची जबाबदारी आहे त्यानुसार युद्धपातळीवर सर्वांना पुरेसे पाणी मिळेल त्यासाठी आमचे प्रयत्न असल्याचे विक्रम साबळे यांनी बोलताना सांगितले.

## तळा येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबिरात विविध दाखले वाटप

**तळा : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व शिबीराचे आयोजन कुणबी समाज सभागृह तळा येथे करण्यात आले होते यामधे विविध योजनांच्या लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वाटप मान्यवरांचे हस्ते करण्यात आले होते.

यावेळी तहसीलदार स्वाती पाटील, उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे,मुख्याधिकारी मनिषा वजाले, चंद्रकांत राऊत,राकेश वडके, ज्ञानेश्वर भोईर,नगरसेवक तहसिल कर्मचारी,सर्व ग्राम महसूल अधिकारी,महसुलसेवक,आदि मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

सदर प्रसंगी ३६ उत्पन्नाचे दाखले,तीन लाभार्थ्यांना संजय गांधी निराधार योजनेचा लाभ, नगरपंचायती मार्फत चार जन्म दाखले,२ मृत्यू दाखले व अंगणवाडी विभागाद्वारे ३ लाभार्थ्यांना मातृवंदना योजनेचा लाभ देण्यात आला आहे.असा लाभार्थ्यांना लाभ देऊन विविध योजनांची माहिती यावेळी देण्यात आली आहे.

या योजना नागरिकांपर्यंत पोहविण्याचा नेहमीच प्रयत्न केला जात आहे, असे सूचित करण्यात आले.



## एसएससी परीक्षेत सह्याद्री विद्यालयाच्या मुलींची बाजी

**खोपोली : प्रतिनिधी**

मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी परीक्षेचा निकाल ऑनलाईन पद्धतीने दिनांक ८ मे रोजी जाहीर करण्यात आला.खालापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या सह्याद्री विद्यालय शिळफाटा मराठी माध्यमाचा एकूण निकाल ८७.३७ टक्के तर सह्याद्री इंग्लिश स्कूलचा निकाल १०० टक्के लागला. सह्याद्री शाळेतून यंदाही मुलींनी टक्केवारीत सरस कामगिरी करत आपले वर्चस्व सिद्ध केले

मराठी माध्यम प्रथम क्रमांक कु. पाटील पूनम चंद्रकांत ८९.६० टक्के व कु. म्हात्रे प्रचिती रोहीदास ८९.६० टक्के गुण मिळवले त्यांना वर्गशिक्षिका वैशाली पाठक व मुख्याध्यापक हेमंत खाडे यांचे मार्गदर्शन लाभले.

पान १ वरुन

### एमएनएम विद्यालयाचा १०० टक्के निकाल

दहावी बोर्ड परीक्षेतील नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, नगरसेवक परेश ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, सचिव डॉ. एस. टी. गडदे, शाळेचे चेअरमन भार्गव ठाकूर, मुख्याध्यापिका सायली वडवलकर, पर्यवेक्षक प्रणिता गोळे, अरुण जोशी, शिक्षक यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### समाजात एकता अन् प्रगतीसाठी महान व्यक्तींच्या कार्याचा आदर्श महत्त्वाचा -लोकनेते रामशेठ ठाकूर

या सोहळ्याच्या निमित्ताने रायगड जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मंगेश वाकडीकर, पनवेल महापालिकेचे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील, पनवेल पंचायत समिती सभापती रंजना वास्कर, उपसभापती भूपेंद्र पाटील तसेच पनवेल व उरण तालुक्यातील जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांचा सत्कार करण्यात आला.

थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगतसाहेबांच्या स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणाऱ्या सर्वोत्कृष्ट स्वच्छ ग्रामपंचायतीचा सन्मान यंदा करंजाडे ग्रामपंचायतीने पटकावला. त्यांना एक लाख रुपये व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पळस्पे ग्रामपंचायत (५० हजार रुपये व सन्मानचिन्ह), तृतीय क्रमांक पाले बुद्रुक ग्रामपंचायत (२५ हजार रुपये व सन्मानचिन्ह), तर उत्तेजनार्थ बक्षीस शिवकर ग्रामपंचायत आणि नेरे ग्रामपंचायतीने (प्रत्येकी ११ हजार रुपये आणि सन्मानचिन्ह) प्राप्त केले.

गव्हाण ग्रामपंचायत अंतर्गत ग्रामस्वच्छता पुरस्कार स्पर्धेत प्रथम क्रमांक शेलघर (५० हजार रुपये), द्वितीय क्रमांक शिवाजीनगर (२५ हजार रुपये), तर तृतीय क्रमांक कोपर गावाला (१५ हजार रुपये) मिळाला.

याशिवाय कला, क्रीडा, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय आणि अभिमानास्पद कामगिरी करणाऱ्या जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेतील विविध शाखांचा आणि विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ झाला. यावेळी 'द फोक मराठी' हा सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडला. यात मराठी लोककलेचे विविध प्रकार सादर करण्यात आले. कार्यक्रमात सहभागी कलाकारांनी उत्कृष्ट सादरीकरण करून मराठी संस्कृतीचे सुंदर दर्शन घडवले.

जनार्दन भगतसाहेब हे केवळ एक व्यक्तिमत्त्व नव्हते, तर ते एक विचार होते, प्रेरणा होते आणि ते विचार, प्रेरणा कायम स्मरणात राहून वाटचाल करीत राहूया, अशा भावना उपस्थित मान्यवरांनी आपल्या भाषणात व्यक्त करीत भगतसाहेबांना आदरांजली वाहिली.

## माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**माणगाव : प्रतिनिधी**

छत्रपती शिक्षण मंडळ संचालित माध्यमिक विद्यामंदिर रातवड विद्यालयाचा शालांत परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२६चा निकाल १०० टक्के लागला असून विद्यालयाने सलग १३व्या वर्षी १०० टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यालयाच्या या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

यंदा विद्यालयातून एकूण १४ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी सर्व १४ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुण संपादन करून विद्यालयाच्या यशात भर घातली आहे. विद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांमध्ये कु. संस्कृती केतन ऐतने ९३.८० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कु. अंतरा काशीराम पवारने ८४.६० टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला, तर कु. निधी नितीन जंगमने ८३.८० टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक संपादन केला.

निकालामध्ये विशेष श्रेणीत ११ विद्यार्थी, प्रथम श्रेणीत १ विद्यार्थी तसेच द्वितीय श्रेणीत २ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, विद्यार्थ्यांची मेहनत तसेच पालकांचे सहकार्य महत्त्वाचे ठरले आहे. या यशाबद्दल संस्थेचे पदाधिकारी अध्यक्ष डॉ. नंदकिशोर जोशी, सरचिटणीस डॉ. निलेश रेवगडे, शालेय समिती अध्यक्ष सुनील पाटील, यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# पनवेल महापालिकेकडून अतिक्रमणविरोधी धडक कारवाई





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल प्रभाग समिती ड मार्फत गुरुवारी (दि. ८) मोठी अतिक्रमणविरोधी कारवाई करण्यात आली. पनवेल महानगरपालिका प्रभाग समिती ड हद्दीतील अंतिम भूखंड क्रमांक २१७ मधील पनवेलमधील ऐतिहासिक ज्यू दफनभूमीशी संबंधित असलेल्या वादग्रस्त जागेवरील अनेक घरे आणि इतर बांधकामांवर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने तोडक कारवाई करण्यात आली. पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात न्यायालयीन आदेशानुसार ही निष्कासन कारवाई करण्यात आली.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनूसार ही कारवाई करण्यात आली. या कारवाईवेळी अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, सहाय्यक आयुक्त तथा प्रभाग अधिकारी डॉ. रूपाली माने तसेच प्रभारी प्रभाग अधीक्षक राजेश डोंगरे व पोलीस दल, अग्निशमन दल, रायगड सुरक्षा रक्षक, एमएफचे सुरक्षा बल तसेच सर्व प्रभागातील अतिक्रमण कर्मचारी उपस्थित होते.

अनधिकृत व्यवसाय करणाऱ्या व अनधिकृत अतिक्रमण करणाऱ्यांविरोधात महापालिकेने तोडक कारवाईचा बडगा उगारला असून यापुढेही अतिक्रमणांवर अशाच प्रकारची कारवाई सुरू राहील, असे महापालिकेतर्फे सूचित करण्यात आले आहे.

# गव्हाण विद्यालयाची चमकदार कामगिरी; दहावीच्या परीक्षेत ९८.९५ टक्के निकाल

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा मंडळ पुणे यांच्या वतीने फेब्रुवारी-मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या एस.एस.सी.अर्थात इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून रयत शिक्षण संस्थेच्या येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजने आपल्या उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखत बाजी मारली आहे.



विद्यालयाचा निकाल ९८.९५%, तर गुरुकुल आणि सेमी इंग्रजी विभागाचा निकाल १००% लागला आहे. विद्यालयामधील एकूण १९२ विद्यार्थी बोर्ड परीक्षेस प्रविष्ट झाले. त्यापैकी १९० विद्यार्थी उत्तीर्ण झाले. एकूण उत्तीर्ण विद्यार्थ्यांपैकी ३२ विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले असून ६१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. विद्यालयाच्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखणाऱ्या विद्यार्थ्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन तथा रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत तसेच रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, ज्युनिअर कॉलेज विभाग स्थानिक शाळा समितीचे सदस्य ॲड. राहुल घरत व विजयशेठ घरत, विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, उपप्राचार्य विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेज विभागाचे प्रमुख संजय उगले व पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन केले. इयत्ता दहावीचे वर्गशिक्षक प्रशांत परदेशी, सागर रंधवे व संदीप भोईर यांच्यासह सर्व विषय शिक्षक आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचेही सर्वत्र अभिनंदन होत आहे.

### विद्यालयातील प्रथम तीन क्रमांक प्राप्त विद्यार्थी

**प्रथम** : कु. प्रसाद प्रदीपकुमार, ४४४ गुण (८८.८०%), **द्वितीय** : जाधव यश दत्तात्रय, ४४२ गुण (८८.४०%), **तृतीय** : (विभागून) कु. घोलप सही संतोष, गुण ४३५ (८७%) आणि कु. कोळी अविका शैलेंद्र, गुण ४३५ (८७%).

## निवडक

### टेम्पोच्या धडकेत पादचारी जखमी

**नवीन पनवेल :** टेम्पोने दिलेल्या धडकेत टेम्पो अंगावरून गेल्याने सचिन रघुनाथ चव्हाण (वय ४०, राहणार कामोठे सेक्टर ११) हे जखमी झाले. या प्रकरणी लहान टेम्पोच्या चालकाविरोधात तळोजा पोलीस ठाण्यात ७ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ७ मे रोजी दीड ते पावणेदोनच्या दरम्यान फिर्यादी सचिन चव्हाण हे त्यांच्या ताब्यातील गाडी देवीचा पाडाजवळील कंपनीत भरण्यासाठी लावून कंपनीच्या आवारात डॉकयार्डसमोर पायी जात होते. त्यावेळी त्यांच्या पाठीमागून एक लहान टेम्पोवरील चालकाने टेम्पो वेगाने चालवला आणि त्यांना ठोकर मारली. यावेळी सचिन हे रस्त्यावर पडले आणि त्यांच्या अंगावरून टेम्पो गेला. यात ते जखमी झाले.

### अश्लील व्हिडीओप्रकरणी गुन्हा

**नवीन पनवेल :** महिलेचा जुना फोटो घेऊन एआय तंत्रज्ञानाचा वापर करून अश्लील व्हिडीओ तयार केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरोधात ५ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. यातील पीडित फिर्यादी महिला यांचा जुना फोटो अज्ञात आरोपीने प्राप्त केला आणि एआय तंत्रज्ञानाचा वापर करून अश्लील व्हिडीओ तयार केला. त्यानंतर त्यांची बदनामी करण्याच्या उद्देशाने व्हॉट्सअप प्रसारमाध्यमांमध्ये प्रसारित केला. या प्रकरणी अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### साडेतीन लाखांचे ड्रग्ज जप्त

**पनवेल** : अमली पदार्थविरोधी पथकाने सापळा रचून ड्रग्ज तस्कराला अटक केल्याची कारवाई कामोठ्यात करण्यात आली आहे. त्याच्याकडे ३ लाख ६० हजारांचे ८ ग्रॅम एमडी ड्रग्ज मिळून आले आहे. अब्दुल खालिद अब्दुल रशीद शेख (३४) असे आरोपीचे नाव आहे. ड्रग्ज तस्कर सराईत गुन्हेगार असून २०१२ मध्ये त्याच्यावर हत्येचा गुन्हा दाखल आहे. वरिष्ठ निरीक्षक संदीप निगडे यांच्या पथकाने कामोठेत सापळा रचला होता. यावेळी संशयित तरुण ड्रग्ज घेऊन त्याच्या राहत्या घरी गेल्याचे समजले. त्यावरून सेक्टर ३४ येथील मानसरोवर कॉम्प्लेक्समधील घरावर पथकाने छापा टाकला व त्याला ताब्यात घेतले. अब्दुल शेखवर २०१२ मध्ये कळंबोली पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल असल्याचे समोर आले. हा एमडी त्याने गोवंडीमधून विक्रीसाठी आणला होता.

### महिलेसोबत चिमुरडी बेपत्ता

**पनवेल** : खारघर सेक्टर ५ परिसरातून २२ वर्षीय महिला आणि तिची दोन वर्षांची मुलगी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात मिसिंगची नोंद करण्यात आली असून पोलिसांकडून शोधमोहीम सुरू करण्यात आली आहे. रशिदा फिरोजअली शेख (२२) आपल्या दोन वर्षीय मुलीला सोबत घेऊन सेक्टर ५, खारघर येथील आपल्या राहत्या घरातून कोणालाही न सांगता निघून गेली. ती अद्याप घरी परत न आल्याने पती फिरोजअली अब्दुल शेख यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

### मीनाताई ठाकरे अभ्यासिकेचे यश

**उरण** : उरण नगरपरिषद संचलित माँसाहेब मीनाताई ठाकरे वाचनालय येथील अभ्यासिकेत अभ्यास करणाऱ्या कु. श्रीकांत सांगोलकर या विद्यार्थ्याची नवी मुंबई पोलीस दलात निवड झाली आहे. सदर अभ्यासिका तत्कालीन जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर यांच्या संकल्पनेतून चार वर्षांपूर्वी सुरू करण्यात आली होती. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून श्रीकांत सांगोलकर याने हे यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे या अभ्यासिकेतील विद्यार्थ्याने मिळविलेले हे १० वे यश आहे. यापूर्वीही या अभ्यासिकेतील यापूर्वी ९ विद्यार्थी एमपीएससी, पोलीस, तलाठी, मुंबई महापालिका, खाजगी कंपन्या, अशा विविध स्पर्धा परीक्षांमध्ये यशस्वी झाले आहेत. या निवडीमुळे अभ्यासिकेत अभ्यास करणाऱ्या इतर विद्यार्थ्यांमध्ये अधिक उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. श्रीकांत याने आपले मनोगत व्यक्त करताना उरणमधील ही एकमेव अभ्यासिका आहे जिथे आम्हाला वेळेचे बंधन नाही. त्यामुळे शहरी तसेच ग्रामीण भागातील गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना मोफत अभ्यासाची सुविधा उपलब्ध करून देण्याचा नगरपरिषदेचा उद्देश सफल होत असल्याची भावना यावेळी व्यक्त केली.

# नऊ तास वीजपुरवठा बंद

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील आकुर्ली-सुकापूर परिसरात महानगर गॅस कंपनीच्या खोदकामादरम्यान झालेल्या निष्काळजीपणामुळे २२ केव्ही नेरे मुख्य उच्चदाब वीजवाहिनीचे मोठे नुकसान झाले. परिणामी तब्बल नऊ तास वीजपुरवठा बंद राहिल्याने १००हून अधिक गाव-वाड्यांतील हजारो ग्राहकांना अंधाराचा सामना करावा लागला.

महानगर गॅसच्या कामासाठी सुरू असलेल्या खोदकामावेळी वीजवाहिनी तुटल्याने संपूर्ण परिसरातील वीजपुरवठा अचानक खंडित झाला. पर्यायी यंत्रणा उपलब्ध नसल्याने महावितरणला वीजपुरवठा तातडीने सुरू करता आला नाही. त्यामुळे नागरिकांना रात्रभर अंधारात बसावे लागले. ऐन उन्हाळ्यात वीज गेल्याने आबालवृद्ध, लहान मुले आणि नागरिकांचे मोठे हाल झाले.

घटनेची माहिती मिळताच महावितरणचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. रात्रभर युद्धपातळीवर दुरुस्तीचे काम सुरू ठेवण्यात आले. अखेर पहाटे पावणेसहाच्या सुमारास वीजवाहिनी दुरुस्त करून वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला. अचानक झालेल्या बिघाडामुळे महावितरणचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनाही रात्रभर जागरण करावे लागले. महानगर गॅस कंपनीच्या खोदकामातील निष्काळजीपणामुळे ही परिस्थिती निर्माण झाल्याचा आरोप नागरिकांनी केला. या घटनेप्रकरणी संबंधितांवर कारवाई केली जाणार असल्याची माहिती महावितरणच्या अधिकाऱ्यांनी दिली.

# एसईझेडच्या जमीन फेरफारप्रकरणी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले चौकशीचे आदेश

**उरण : बातमीदार**

उरण तालुक्यातील हजारो एकर जमीन महामुंबई एसईझेड या विशेष प्रयोजनासाठी सन २०१०मध्ये संपादित करण्यात आली आणि त्या सर्व सातबारावर मुंबई एसईझेड चे नाव दाखल झाले. त्यामुळे सदर जमिनीच्या सात बारावर कोणत्याही व्यक्तीचे नाव कोणत्याही परिस्थितीत लागू शकत नाही. तरीही तसदरहू जमीन बेकायदेशीररित्या त्रयस्थ व्यक्तीच्या नावे हस्तांतरित केली गेली आहे. सदर जमिनींच्या किमती अब्जावधी रुपये सांगण्यात



येत आहे.

सदर केसेसमध्ये मुंबई एसई झेडचे वकील ॲड सागर जगे यांनी लेखी म्हणणे आणि अवॉर्ड कॉपी सादर करून सदर हस्तांतरणास लेखी हरकत नोंदविलेली आहे. तरीही तहसीलदार उरण डॉ उद्धव कदम यांना ह्याबद्दल विचारले असता त्यांनी रीतसर सुनावणी घेऊन कलम २३६ अन्वये कायदेशीररित्या आदेश पारित केल्याचे सांगितले.

मुंबई एसईझेड उलवे येथील अधिकारी आणि लीगल टीमने स्पष्ट सांगितले की आम्हाला तहसीलदार उरण डॉ उद्धव कदम यांनी १५ नोटीस पाठविलेल्या असून त्या प्रत्येक केसमध्ये सदर हस्तांतरण बेकायदेशीर असून त्यास लेखी हरकत नोंदविलेली आहे तसेच प्रत्येक केसमध्ये अवॉर्ड कॉपी देखील सादर केलेली आहे.

अवॉर्ड कॉपी सादर केल्यावर त्या जमिनीसंदर्भात कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार महसूल न्यायाधिकरणाला नाही तो अधिकार सिव्हिल कोर्टाला आहे. याचाच अर्थ तहसीलदार उरण डॉ. उद्धव कदम यांनी सिव्हिल कोर्टाचे अधिकार वापरल्याचे स्पष्ट होत आहे.

सदर बाब अत्यंत गंभीर असून महसूलमंत्री बावनकुळे यांनी ह्या विषयाच्या चौकशीचे आदेश दिले असून कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल यांना १५ दिवसांत अहवाल सादर करण्यास सांगितले.

चौकशीमध्ये किती सातबारा हस्तांतरित केले आहेत हे स्पष्ट होईल आणि ह्या अवैध हस्तांतरणमध्ये कोण कोण जबाबदार आहेत हेदेखील स्पष्ट होणार आहे.

# महिला दक्षता समितीची मासिक बैठक संपन्न




**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाणे हद्दीतील महिला दक्षता समिती सदस्यांची मासिक बैठक नुकतीच आयोजित करण्यात आली होती. या बैठकीला वपोनि. गजानन घाडगे व पोलीस उपनिरीक्षक जितेंद्र म्हात्रे यांनी विशेष मार्गदर्शन तसेच सूचना केल्या. त्यामध्ये महिला-मुलींच्या सुरक्षेवर चर्चा आणि मार्गदर्शन केले.

सायबर क्राईम, नशामुक्ती चर्चा, मार्गदर्शन व सदर बाबत माहिती मिळाल्यास डायल ११२ वर संपर्क करणे. शाळा, कॉलेज येथे विद्यार्थिनींच्या सुरक्षेच्या दृष्टीने महिला वार्डन नेमणेबाबत उपस्थित शिक्षिका-महिला दक्षता सदस्यांना सूचना केली आहे. महिला सक्षमीकरण, महिलांच्या अडीअडचणी याकरिता पोलीस ठाण्यात महिला पोलीस अधिकारी व महिला पोलीस अंमलदार यांची नेमणूक करण्यात आली आहे. सदस्यांच्या अडीअडचणी ऐकून समस्यांचे निराकरण करण्यात आले.

# जितेंद्र म्हात्रे यांना पोलीस उपनिरीक्षकपदी बढती

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असणारे जितेंद्र म्हात्रे यांना महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागातर्फे पोलीस उपनिरीक्षकपदाची बढती देण्यात आली आहे. जितेंद्र म्हात्रे १९९३ साली पोलीस खात्यात कॉन्स्टेबल म्हणून भरती झाले. प्रथम त्यांनी रायगड जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यात कामकाज पाहिले आहे.

यानंतर त्यांची बदली नवी मुंबई आयुक्तालयात झाली. यामध्ये विशेष शाखा, खंडणीविरोधी पथक, गुन्हे शाखा विविध पोलीस ठाणे येथे कार्यरत राहून त्यांनी आपल्या कामाचा ठसा उमटवला. या कामाची दखल शासनाने घेऊन त्यांना २०२५ साली राष्ट्रपती पदक देण्यात आले. सध्या ते पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे कार्यरत असताना त्यांना पोलीस उपनिरीक्षकपदाची बढती देण्यात आल्याने त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटी विद्यासंकुलात मुलींची बाजी

**उरण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या दहावी शालांत परीक्षेचा निकाल ८ मे रोजी दुपारी १.०० वाजता ऑनलाइन पद्धतीने जाहीर करण्यात आला. यात उरण तालुक्यातील चिरनेर येथील पी. पी .खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक विद्यालयातील मराठी माध्यमातील विद्यार्थ्यांनी आणि ठकुबाई परशुराम खारपाटील इंग्रजी माध्यमातील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले असून यात इंग्रजी आणि मराठी माध्यमातून मुलींनीच बाजी मारली आहे.



पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या संकुलातील इंग्रजी माध्यम विद्यालयाचा शेकडा निकाल १०० टक्के लागला आहे, तर मराठी माध्यम विद्यालयाचा शेकडा निकाल ८८.८९ टक्के लागला आहे.

यात ठकुबाई खारपाटील इंग्रजी माध्यमाच्या विद्यालयाने आपली १०० टक्के निकालाची सलग सहा वर्षांची परंपरा कायम राखली असून इंग्रजी माध्यमाच्या संकुलातून प्रेरणा घनश्याम पाटीलने ८९.०० टक्के गुण मिळवून इंग्रजी माध्यम स्कूलमध्ये प्रथम येण्याचा मान पटकावला आहे. अनुष्का नारंगीकर ८७.८० टक्के गुण मिळवून द्वितीय आली. आर्या भोईर ८४.६० टक्के गुण मिळवून तृतीय आली.

मराठी माध्यमातून त्रिशा म्हात्रेने ८८.८९ टक्के गुण मिळवून प्रथम येण्याचा मान पटकावला. जिज्ञासा म्हात्रेने ८५.६० टक्के गुण मिळवून दुसरी आली. जिया पाटीलने ८१.०० टक्के गुण मिळवून तिसरी आली. विद्यार्थ्यांचे सचिव सागर खारपाटील, संचालिका अर्चना ठाकूर, प्रशासकीय अधिकारी व्ही. ए. पाटील, प्राचार्य मिलिंद पट्टेबहादूर, मुख्याध्यापिका सुप्रिया म्हात्रे, पर्यवेक्षक आनंद चिर्लेकर, मंदा घरत, स्मिता मसुरकर, विद्या संकुलाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# यूईएस इंग्लिश मीडियमचा ९९.४५ टक्के निकाल

**उरण : प्रतिनिधी**

यंदा जाहीर झालेल्या १०वीच्या निकालात यूईएस इंग्लिश मीडियम स्कूलचा ९९.४५ टक्के निकाल लागला असून, कुमारी गावंड अनुपा प्रशांत हिने ९६ टक्के गुण मिळवून पहिला क्रमांक मिळविला आहे.

कुमारी थळी निष्ठा उदय हिने ९५.४० टक्के मिळवून दुसरा क्रमांक मिळविला, तर कुमारी म्हात्रे नम्रता मंगेश हिने ९४.८० टक्के मिळवून तिसरा क्रमांक मिळविला. कुमार म्हात्रे अर्थव केतन याने ९४.२० टक्के मिळवून चौथा क्रमांक तसेच कुमारी नार्वेकर आयुषी अमित आणि कुमार चव्हाण प्रसाद विजय या दोघांनी ९४.०० टक्के गुण मिळवून पाचवा क्रमांक मिळविला आहे.

यंदाचा निकाल हा केवळ संख्यात्मक नसून तो गुणात्मक व उल्लेखनीयही आहे. म्हणूनच यूईएसच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. या यशात विद्यार्थ्यांबरोबर त्यांचे आईवडील तसेच यूईएसचे कमिटी मेंबर्स, स्कूल व ज्यु. कॉलेजच्या प्राचार्या, सर्व शिक्षक ह्यांचाही सहभाग आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्यावर मेहनत घेणाऱ्या सर्व शिक्षकांचे कौतुक केले जात आहे.

# अमानुष अत्याचारप्रकरणी नराधमास फाशीची शिक्षा देण्याची मागणी

**उरण : प्रतिनिधी**

पुणे शहरात ६४ वर्षीय वृद्ध नराधमाने केवळ चार वर्षांच्या निरागस मुलीवर अमानुष बलात्कार करून तिची निर्घृण हत्या केल्याच्या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हादरला आहे. या अमानवीय, क्रूर व माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटनेच्या निषेधार्थ उरण तालुक्यातील सुजाण नागरिकांच्या वतीने 'पत्रकार उत्कर्ष समिती' मार्फत उरणचे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांना निवेदन देण्यात आले. सदर नराधम आरोपीचा खटला 'फास्ट ट्रॅक न्यायालयात' चालवून ६ महिन्यांत निकाल लावत फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, ४ वर्षांची चिमुकली, जिचे जग पाहणेही सुरू झाले नव्हते, तिच्यावर अशा पद्धतीने अत्याचार करून तिचे जीवन संपवणारा नराधम माणूस म्हणवून घेण्याच्या लायकीचा नाही. अशा विकृत प्रवृत्तीला समाजात राहण्याचा कोणताही अधिकार नाही. या घटनेमुळे मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून पालकांच्या मनात प्रचंड भीती व संतापाची लाट उसळली आहे.

## संपादकीय

# विश्वासाचे नवे वारे

टीसीएसमधील त्या धर्मांधांच्या उपद्व्यापामुळे जिल्हयातील उद्योगक्षेत्रात अविश्वासाचे आणि असुरक्षिततेचे वातावरण पसरले असताना, नव्या उद्योगांसाठी घातल्या गेलेल्या पायघड्यांमुळे पुन्हा एकदा नाशिकच्या उद्योगविश्वात आश्वस्ततेची जाणीव रुजणार आहे.

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते नाशिकच्या काळाराम मंदिरावर धर्मध्वजा फडकावून सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पूर्वतयारीचा मुहूर्त करण्यात आला, त्याच दिवशी नाशिक जिल्ह्यात काही महत्वाकांक्षी गुंतवणूक प्रकल्पांचे करारदेखील झाले. देशातील पहिले ट्रायबल इंडस्ट्री क्लस्टर नाशिक जिल्ह्यातील जांबुटके येथे उभे राहणार आहे. सुमारे १३ हजार कोटी रुपयांहून अधिक रकमेच्या गुंतवणूक प्रस्तावामुळे ३०० हून अधिक उद्योगांना चालना मिळणार असून रोजगाराच्या सुमारे ३२ हजार नव्या संधी निर्माण होतील असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. एका बाजूला सिंहस्थ कुंभमेळ्याच्या मुहूर्तावर नाशिकच्या विकासाच्या आणि रोजगाराच्या नव्या संधींचे एक नवे द्वार उघडले जात आहे, तर याच शहरातील टीसीएस नावाच्या कंपनीतील धर्मवेड्या कट्टरतेमुळे उद्योगक्षेत्र आणि धर्मांधता यांच्या एका विकृत रूपाची पाळेमुळे उघड होत आहेत, म्हणून या दोन घटनांचा एकत्रित मागोवा घ्यायला हवा. येत्या वर्षभरात नाशिक नगरीत सिंहस्थ कुंभपर्वाचे नगारे वाजत राहतील, आणि नाशिकचा भूमी धर्मजागराच्या जाणिवांनी दुमदुमत राहील, पण या उत्सवाच्या निमित्ताने नाशिक जिल्ह्याच्या आणि महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेला मोठा हातभार लागणार असून जनतेची जीवनशैली उंचावणारा धर्मसोहळा म्हणून त्याचे वेगळेपण अधोरेखित झालेले असेल. काही महिन्यांपूर्वी एका भोंदू धर्मविकृताच्या कारवाया आणि टीसीएस सारख्या नामांकित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपनीतील धर्मप्रसाराच्या विकृत कारवायांमुळे हा जिल्हा काळवंडून गेला होता. धर्मध्वजाच्या उभारणीसोबत झालेल्या नव्या उद्योगभरारीच्या जाणिवांमुळे ही उदासीनता आता पुसली जाणार असून उद्योगविश्वातील चांगल्या दिवसांचा नवा प्रारंभही पाहावयास मिळणार आहे. याचाच पुरावा म्हणून, टीसीएस कंपनीतील त्या विकृत धर्मांतर प्रकरणाची सूत्रधार असल्याचा आरोप असलेली निदा खान नावाची तरुणी कारवाईच्या कचाट्यात अखेर सापडली आहे, आणि त्या प्रकरणाची पाळेमुळे खणून काढत असताना काही अनपेक्षित धागेदोरेही तपास यंत्रणांच्या हाती लागत आहेत. निदा खान ही या धर्मांतर प्रकरणातील मुख्य आरोपी असल्याचे सांगण्यात येते. नाशिक जिल्हा सत्र न्यायालयाने तिचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळल्यापासून जवळपास आठवडाभर ती तपास यंत्रणांना गुंगारा देत होती. अखेर गुरुवारी रात्री छत्रपती संभाजीनगरमध्ये तिला अटक करून पोलिसांनी तिला न्यायालयासमोर हजर केले. निदा खानच्या अटकेनंतर अनेक धक्कादायक बाबी समोर येत आहेत. या गुन्ह्याचा वेगवेगळे कंगोरे आहेतच, पण धर्मांधता हाच या गुन्ह्याचा मुख्य आधार होता असे ठामपणे सांगितले जात आहे. या प्रकरणात कंपनीबाहेरच्या अन्य कोणाचा सहभाग आहे, हे प्रकरण केवळ एका कंपनीपुरते मर्यादित आहे, की त्याची पाळेमुळे अन्यत्रही पसरलेली आहेत, यावर यथावकाश प्रकाश पडेलच, पण परदेशातही या कटाचे धागेदोरे पोहोचतात का, याचाही तपास पोलिसांनी सुरू केला आहे. या तरुणीची पाठराखण करणारे कोण आहेत, याचाही तपास होईल, तेव्हा उद्योगविश्वात भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या या कटाचे सारे पैलू स्पष्ट होतील. एका परीने, नाशिक जिल्ह्यातील उद्योगक्षेत्रात निर्माण झालेली असुरक्षितता दूर होणे आणि नव्या गुंतवणूक करारांतून नव्या विश्वासाचे वातावरण निर्माण होणे या दोनही घटना एकाच वेळी होत असल्याने, एक मोठा गुंता आता सुटणार आहे.**

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग : एक परिवर्तन

१ मे २०२६च्या माननीय मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखालील उद्घाटनानंतर मुंबई-पुणे द्रुतगती अर्थात यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरून जाण्याचा योग आला व या मार्गाच्या परिवर्तनावर एक छोटेसे चिंतन.

सन २०१५मध्ये महाराष्ट्र शासनाच्या मंत्रालयातील पायाभूत सोयी सुविधा समितीने मंजुरी दिलेले हे प्रकल्प सन २०२५ ते २०२६ मध्ये पूर्ण झाले आहेत यात समृद्धी महामार्गाचा सुद्धा समावेश होतो. यात महाराष्ट्र शासनाची तसेच महाराष्ट्र राज्य रस्ते महामंडळाची प्रकल्प पूर्णत्वाची गतिमानता अधोरेखित होते.

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग हा खोपोलीच्या घाटात वाहनांच्या कोंडीत सापडायचा व पुणे मुंबई प्रवास हा ७ ते ८ तासांचा ठरायचा. त्यानंतर मुंबई पुणे द्रुतगती मार्गाने हा प्रवास ४ ते ५ तासांवर नेऊन ठेवला त्यात घाटातील वळणे सुधारित केली गेली व रस्त्याची रुंदी सुद्धा वाढवली. या मार्गावर घाटात आडोशी व खंडाळा हे दोन टनेल आहेत त्यापैकी आडोशी हा वन वे टनेल तर खंडाळा हा टू वे टनेल आहे. याच भागात मोठ्या प्रमाणात भूस्खलन व्हायचे व प्रवाशांना पावसाळ्यात गाडी चालवताना जीव मुठीत धरावा लागत असे.

मुंबईकडून पुण्याला जाताना खालापूरच्या फूडमॉलपासून पासून कुसगावपर्यंतचा हा भाग लोणावळा व खंडाळा दरम्यानचा अवघड असा घाट भाग होता. या भागात मुंबई पुणे द्रुतगती मार्गाचे देखभाल व दुरुस्ती केंद्र त्यापुढे वळवण कनेक्टर तसेच लोणावळा व खंडाळा एक्झिट, खंडाळा टनेल तदनंतर अमृतांजन



ब्रिज ज्यामुळे कोकण व पुणे भाग विभागला जात होता नंतर दस्तुरी पॉईंट व वनविभागाचे विश्रामगृह, मुंबई पुणे द्रुतगती मार्गाची व राष्ट्रीय महामार्गाची सामायिक लांबी, वाय पॉईंट, अडोशी टनेल तसेच खोपोली एक्झिट असे पॉईंटस आहेत. हा भाग पावसाळ्यात निसर्गसौंदर्याने नटलेला असायचा व गाडीतून जाताना छोटे छोटे धबधबे तसेच हिरवेगार डोंगर मन मोहून टाकायचे.

याच भागात गाड्या बंद पडायच्या व त्या दुरुस्त करण्यासाठी मेकॅनिक हे टू व्हीलरवरून हिंडायचे. बऱ्याच प्रवाशांना प्रश्न पडायचा की द्रुतगती मार्गातून यावर दुचाकी वाहने कशी काय दिसत आहेत? परंतु याच भागात मुंबई पुणे द्रुतगती मार्गावर राष्ट्रीय महामार्गाचा सामायिक भाग असल्याने हे दृश्य दिसणे स्वाभाविक होते. परंतु बऱ्याच प्रवाशांना याची कल्पना नाही.राष्ट्रीय महामार्ग व द्रुतगती मार्ग हे सामायिक असल्याने राष्ट्रीय महामार्गावरून दुचाकी वाहनांना प्रवास करता येतो.

नवीन मिसिंग लिंक प्रकल्पात जुन्या मुंबई पुणे द्रुतगती मार्गाची जी अलाइनमेंट होती तीच अलाइनमेंट वापरून हा प्रकल्प पूर्ण केलेला आहे. या प्रकल्पात एक महाकाय टनेल व केबल स्टेड ब्रिजचा समावेश आहे. यामुळे घाटातील अलाइनमेंटला एक सरळता व सुलभता आलेली आहे. टनेल ची लाइटिंग अतिशय उत्तम असून टनेलच्या रुंदीची नोंद ही गिनीज बुकात घ्यावी लागली आहे. सर्वसाधारणपणे २३ मीटर रुंद व दहा मीटर उंच असा हा टनेल किंवा बोगदा आहे.या प्रकल्पामुळे आपणास वेळेची बचत साध्य झालेली आहे व मुंबई ते पुणे हा प्रवास २ ते ३ तासात करणे सहज शक्य झाले आहे.

मालवाहतुकीची वाहने ही मूळ द्रुतगती मार्गावरून तसेच मिसिंग लिंकने प्रवाशांची वाहने पाठवून सुरक्षिततासुद्धा या प्रकल्पाने साध्य केलीआहे.

या प्रकल्पामुळे आता कुसगाव ते खालापूर फूड मॉल मधील वर नमूद केलेले वेगवेगळे पॉईंट्स आपणास दिसणार नाहीत. खंडाळा टनेल व आडोशी टनेल शोधूनसुद्धा सापडणार नाहीत. घाटातील धबधबे आता पावसाळ्यात खुणावणार नाहीत. दस्तुरी पॉईंटला बंद पडलेल्या गाड्या व दुरुस्तीला येणारे मेकॅनिक सुद्धा दिसणार नाहीत. टायगर व्हॅली दिसणार नाही तसेच तेथील सुंदर धबधबा व बॉलीवूडमधील गाण्यांचा शूटिंगचा टेबल टॉपही दिसणार नाही. दस्तुरी व अमृतांजन ब्रिज तसेच खंडाळा टनेलच्या जवळपास होणारी वाहतुकीची कोंडीसुद्धा आता दिसेनाशी होईल. दूरवर डोंगरात दिसणारी रेल्वेची लाईन व खेळण्यासारखी दिसणारी रेल्वे व घाटाखाली नजरेने दिसणारे खोपोली आता गडप झाल्यात जमा आहे.

परिवर्तन संसार का नियम है आणि हेच "परिवर्तन" तसेच रस्त्यावरील वाहतुकीची सुलभता ,सरळता व सुरक्षितता या मिसिंग लिंकमुळे अधोरेखित झालेली आहे. भूतकाळातील काही पॉईंट्स तसेच रस्त्यावरून दिसणारे लोणावळा व खंडाळा तसेच सह्याद्रीचे डोंगर व जलप्रपात आता दिसणार नाहीत.. म्हणतात ना "कुछ पाने के लिए बहुत कुछ खोना भी पडता है"

मुंबई पुणे द्रुतगती मार्गाचा प्रकल्प हा सुरुवातीला १६००कोटी रुपयांचा होता व तो वाढून २१०० कोटी रुपयांचा झाला असे वाचण्यात आले होते. आता मिसिंग क्लीन चा प्रकल्पही १६०० कोटी रुपयांचा आहे असे वाचण्यात आले.१६०० कोटी रुपयांचा हा योगायोग..असो....

अशा या द्रुतगतीमार्गाच्या मुसाफिरगिरी वर मला "अपनापन" या १९७७च्या चित्रपटातील हे गाणे गुणगुणावेसे वाटले...

आदमी मुसाफिर है,
आता है, जाता है
आते जाते रस्ते में,
यादें छोड जाता है...

**-संतोष कुलकर्णी,**
सोलापूर

# समाजसुधारक गोपाळ कृष्ण गोखले

महाराष्ट्रातील थोर समाजसुधारक गोपाळ कृष्ण गोखले हे आधुनिक भारताचे एक महान नेते, नेमस्त पक्षाचे अध्वर्यु आणि थोर समाजसेवक होते. यांचा जन्म ९ मे १८६६ रोजी महाराष्ट्राच्या रत्नागिरी जिल्ह्यात कोतळूक येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव कृष्ण महादेव गोखले आणि आईचे नाव सत्यभामाबाई कृष्ण गोखले होते.

गोपाळ गोखले यांचे बालपण कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे गेले. इथेच त्यांचे प्राथमिक शिक्षणदेखील झाले. वडिलांच्या मृत्यूनंतर त्यांच्या वडिलबंधू गोविंदराव यांनी स्वतःचे शिक्षण सोडून गोपाळ कृष्ण गोखले ह्यांना उच्चशिक्षणास कोल्हापुरातील राजाराम कॉलेज आणि मुंबईच्या एल्फिस्टन कॉलेजात पाठविले. १८८४मध्ये गणित विषयात बीएची पदवी मिळवून जानेवारी १८८५मध्ये पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षकाची नौकरी स्वीकारली. नंतर पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे आजीव सदस्यत्व, फर्ग्युसन कॉलेजात अध्यापन, १८९५मध्ये मुंबई विद्यापीठाच्या सिनेटवर फेलो म्हणून नियुक्त झाले. त्यांनी शेतकऱ्यांचे कर्ज, दुष्काळ या त्रासांचा सखोल अभ्यास करून सरकारकडे निवेदन पाठविले. १९०५ साली त्यांनी भारत सेवक समाजाची स्थापना केली. हिंदुस्थानात राज्यकारभाराचा खर्च कसा वाढत आहे व त्यामुळे करवाढ कशी डोईजड होत आहे हे गोखले यांनी सप्रमाण दाखवून राजकीय सुधारणांची आवश्यकता प्रतिपादन केली.

१९०२ साली मध्यवर्तीय कायदेमंडळावर निवड झाल्यावर ते नामदार झाले. त्यांनी अर्थसंकल्पांवर जे भाषण केले, त्यामुळे त्यांचे कर्तृत्व व नेतृत्व देशमान्य झाले. त्या विधिमंडळात त्यांनी अर्थसंकल्पावर १२ भाषणे केली. त्यातून तत्कालीन भारताच्या राजकीय, आर्थिक, शैक्षणिक वगैरे प्रश्नांचा उत्कृष्ट ऊहापोह त्यांनी केला. भारतामधील ब्रिटिश साम्राज्याविरोधात स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणारे ते राजकीय आणि सामाजिक नेता होते. साधा स्वभाव, बौद्धिक क्षमता आणि देशासाठी दीर्घकाळ निःस्वार्थ सेवा करण्यासाठी त्यांना नेहमी स्मरले जाईल. ते इंडिया पब्लिक सर्व्हिस सोसायटीचे संस्थापक आणि अध्यक्ष होते. १९ फेब्रुवारी १९१५ रोजी गोपाळ कृष्ण गोखले यांचे निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

### शेती आता होणार स्मार्ट! बळीराजाला एआयची साथ

भारतीय कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवण्यासाठी एव्ही पॉलिमर्स लिमिटेडने एक मोठे पाऊल उचलले आहे. कंपनीने आपली उपकंपनी एव्ही इको स्पार्क प्रायव्हेट लिमिटेडच्या माध्यमातून 'कृषीबडी' हे कृत्रिम बुद्धिमत्तेवर अर्थात एआय आधारित स्मार्ट फार्मिंग प्लॅटफॉर्म लाँच केल्याची घोषणा केली आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना आता शेतीविषयक निर्णय घेणे सोपे होणार असून त्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होणार आहे.



'कृषीबडी' हा एक प्रगत शेती सहाय्यक आहे. जो विशेषतः भारतातील लहान शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आला आहे. याची काही प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

बहुभाषिक AI इंटरफेसः शेतकरी आता त्यांच्या स्वतःच्या प्रादेशिक भाषेत आवाज, मजकूर किंवा फोटोंच्या माध्यमातून शेतीविषयक माहिती मिळवू शकतील. यामुळे तंत्रज्ञानातील भाषेचा अडथळा दूर झाला आहे.

सॅटेलाइट क्रॉप मॉनिटरिंगःउपग्रहाद्वारे पिकांचे रिअल-टाइम निरीक्षण केले जाईल, ज्यामुळे पिकांचे आरोग्य आणि शेतातील परिस्थितीची अचूक माहिती मिळेल.

नफा कॅल्क्युलेटर :थेट बाजारभाव आणि शेतीसाठी झालेला खर्च यांचा विचार करून शेतकरी आपल्या संभाव्य नफ्याचा अंदाज लावू शकतील.

कीड आणि रोग नियंत्रणःस्थानिक हवामान आणि डेटाच्या आधारे पिकांवरील रोग किंवा किडीबद्दल शेतकऱ्यांना आधीच अलर्ट (सूचना) दिले जातील.

हायटेक शेतीवर भरःया प्लॅटफॉर्मद्वारे सॅटेलाइट आधारित पीक देखरेख, बाजारभावावर आधारित नफा कॅल्क्युलेटर आणि पिकांवरील रोग व कीड नियंत्रणासाठी आगाऊ सूचना दिल्या जातील. यामुळे शेतकऱ्यांना अचूक निर्णय घेणे सोपे होईल.

जागतिक बाजारपेठेची दारे उघडणार-

केवळ माहितीच नव्हे, तर कृषीबडी ॲप शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेशी जोडण्याचे कामही करणार आहे. निर्यात नियोजनासारख्या वैशिष्ट्यांमुळे शेतकरी आणि शेतकरी उत्पादक संस्थांना त्यांचे उत्पादन आंतरराष्ट्रीय स्तरावर विकण्याची संधी मिळणार आहे.


# शिक्षणमहर्षी डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील

‘कमवा व शिका’ हा मूलमंत्र देत बहुजन समाजाला शिक्षणाची दारे खुली करणारे थोर समाजसुधारक म्हणजे डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील. त्यांना ‘शिक्षणमहर्षी’ म्हणूनही ओळखले जाते.

भाऊराव पाटील यांचा जन्म २२ सप्टेंबर १८८७ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कुंभोज या गावी एका सामान्य जैन शेतकरी कुटुंबात झाला. गरिबीमुळे त्यांचे शिक्षण फक्त इयत्ता सातवीपर्यंतच झाले. लहानपणीच त्यांना शिक्षणापासून वंचित राहण्याचे दुःख कळले होते.

त्यांचे भाग्य असे की त्यांना छत्रपती शाहू महाराजांचा सहवास लाभला. शाहू महाराजांनी बहुजन समाजातील मुलांसाठी वसतिगृहे सुरू केली होती. भाऊराव काही काळ कोल्हापूरच्या राजवाड्यात राहून शिकले. याच काळात त्यांच्यावर महात्मा जोतिराव फुले आणि महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या सत्यशोधक विचारांचा खोल प्रभाव पडला. त्यांनी फुले स्थापित सत्यशोधक समाजाचे कार्य पुढे नेले.

महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचा आणि छत्रपती शाहू महाराजांच्या कार्याचा त्यांच्यावर प्रभाव पडला. बहुजन समाजातील मुलांसाठी शिक्षण किती गरजेचे आहे हे त्यांनी ओळखले. १९१९मध्ये त्यांनी साताऱ्यात



## निमित्त

‘दुधगाव बोर्डिंग’ ची स्थापना केली. हेच पुढे रयत शिक्षण संस्थेचे पहिले पाऊल ठरले.


४ ऑक्टोबर१९१९ रोजी त्यांनी अधिकृतपणे रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. ‘स्वावलंबी शिक्षण हेच खरे शिक्षण’ हे तत्त्व त्यांनी प्रत्यक्षात आणले. ‘कमवा व शिका’ योजनेतून गरीब, होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच पोट भरण्याची सोय झाली. आज रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील सर्वात मोठी शिक्षण संस्था आहे. शेकडो शाळा, महाविद्यालये व वसतिगृहे संस्थेमार्फत चालवली जातात.

संस्था चालवणे सोपे नव्हते. पैशाची चणचण कायम होती. भाऊरावांनी स्वतः झोळी घेऊन गावोगावी फिरून वर्गणी गोळा केली. लग्नसमारंभात, जत्रेत जाऊन ‘माझ्या पोरांसाठी एक रुपया द्या’ अशी हाक दिली. लोक त्यांना ‘वेडा भाऊराव’ म्हणत. पण त्यांनी कधीच हार मानली नाही. प्रसंगी स्वतःच्या पत्नीचे दागिने विकून ते मुलांच्या जेवणाची सोय करत. त्यांची साधी राहणी, पांढरी गांधी टोपी, धोतर-कुर्ता आणि डोळ्यांवरचा चष्मा हीच त्यांची ओळख बनली.

रयत शिक्षण संस्थेने सातारा, सांगली, पुणे, अहमदनगर, सोलापूर अशा अनेक जिल्ह्यांत शाळा, महाविद्यालये, वसतिगृहे सुरू केली. मुलींच्या शिक्षणावर त्यांनी विशेष भर दिला. ‘मुलगी शिकली, प्रगती झाली’ हे त्यांचे ब्रीदवाक्य होते. आज रयत शिक्षण संस्था ही आशिया खंडातील सर्वात मोठ्या शिक्षण संस्थांपैकी एक आहे. ७०० हून अधिक शाखा आणि लाखो विद्यार्थी या संस्थेत शिकतात.त्यांच्या अफाट कार्याची दखल घेऊन पुणे विद्यापीठाने १९५९साली त्यांना ‘डी.लिट.’ ही सन्माननीय पदवी दिली. म्हणून ते ‘डॉ.’ भाऊराव पाटील झाले.भारत सरकारने १९५९ साली त्यांना ‘पद्मभूषण’ पुरस्काराने सन्मानित केले.

९ मे १९५९ रोजी वयाच्या ७१व्या वर्षी कर्मवीरांचे निधन झाले. पण त्यांनी लावलेली शिक्षणाची ज्ञानज्योत आजही तेवत आहे. हा कर्मयोगी कायम सर्वांच्या हृदयात अजरामर राहील. (साभार : इंटरनेट)


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### उन्हाळ्यात दररोज काकडी खाण्याचे जबरदस्त फायदे

काकडीचे सेवन केल्यामुळे आरोग्याला अनेक फायदे होतात. उन्हाळ्यात डिहायड्रेशनची समस्या खूप सामान्य आहे. उष्णतेपासून वाचण्यासाठी पिण्याच्या पाण्याबरोबरच पाण्याचे प्रमाण अधिक असलेली अशी फळे लोकांना जास्त खायला आवडतात, जी पाण्यानी भरलेली आहेत. काकडीत भरपूर पाणी असते. काकडीमध्ये सुमारे ९५% पाणी असते, ज्यामुळे काकडी खाल्ल्याने आपल्या शरीरास पुरेसे पाणी मिळते. याशिवाय काकडीमध्येही जीवनसत्त्वे आढळतात. काकडीमध्ये भरपूर कॅलरी असतात. काकडी खाल्ल्याने शरीरामध्ये चरबी निर्माण होत नाही. दिवसातून एकदा तरी आपण काकडी खाल्ली पाहिजे.काकडीत अत्यंत कमी कॅलरीज असतात. मध्यम आकाराच्या काकडीत साधारणपणे फक्त ३०-४० कॅलरीज असतात. यामुळे पोषणाशी तडजोड न करता वजन राखायचे किंवा कमी करायचे असलेल्यांसाठी ते एक उत्तम पर्याय बनते. कमी कॅलरीज असूनही काकडी महत्त्वाची जीवनसत्त्वे आणि खनिजे प्रदान करते. त्यात व्हिटॅमिन सी असते, जे रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करणारे एक शक्तिशाली अँटिऑक्सिडंट आहे, स्नायूंच्या कार्यासाठी आणि हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधी आरोग्यासाठी आवश्यक असलेले मॅग्नेशियम आणि पोटॅशियम आणि चयापचय आणि अँटिऑक्सिडंट संरक्षणासाठी महत्त्वाचे असलेले मँगनीज असते. काकडीमधील व्हिटॅमिन के शरीराला कॅल्शियम चांगल्या प्रकारे शोषण्यास मदत करते, हाडे मजबूत करते. यात पोटॅशियमचे प्रमाण जास्त असते, जे शरीरातील सोडियम पातळी संतुलित करते, जे रक्तदाब नियंत्रित करण्यासाठी आवश्यक आहे. काकडीमधील स्टेरॉल खराब कोलेस्ट्रॉल किंवा कमी घनता लिपोप्रोटीन पातळी कमी करण्यास मदत करतात.



काकडी सालासह खाल्ल्यास त्यात मौल्यवान प्रमाणात आहारातील फायबर असते. हे केवळ निरोगी पचन आणि नियमित आतड्यांच्या हालचालींना प्रोत्साहन देत नाही तर भूक नियंत्रित करण्यास मदत करते.काकडीमध्ये असलेले अँटीऑक्सिडंट्स त्वचा निरोगी आणि चमकदार बनवतात. कारण त्यात पाणी, जीवनसत्त्वे आणि फायबर असतात, जे त्वचेला हायड्रेटठेवतात,विषारी पदार्थ बाहेर टाकतात आणि चमक वाढवतात. काकडीमध्ये तंतुमय घटक, पोटॅशिअम आणि मॅग्नेशिअम चांगल्या प्रकारे आढळते. हे पोषक घटक रक्तदाब कमी करण्यासाठी प्रभावी आहेत.

# ग्रामस्थांच्या सतर्कतेमुळे बालविवाह थांबला!

## खालापुरातील घटना; प्रशासनानेही दाखवली तत्परता



**चौक : प्रतिनिधी**

ग्रामस्थांनी चाइल्ड हेल्पलाईन १०९८वर कॉल करून बालविवाहाची माहिती दिल्याने बालविकास, पोलीस, ग्रामस्थ व ग्रामपंचायत अधिकारी, सदस्य, कर्मचारी यांच्या तत्परतेमुळे दोन अल्पवयीन बालविवाह रोखण्यात प्रशासन यशस्वी झाले आहे.

अल्पवयीन मुलगा हरेश कमलू पवारचा विवाह १३ मे रोजी डोणवत येथे आणि शाम रोहिदास पवारचा दिनांक २१ मे रोजी डोणेवाडी, कर्जत येथील मुलींसोबत ठरवण्यात आला होता. याबाबतची गोपनीय माहिती चाइल्ड हेल्पलाइन १०९८ या टोल फ्री क्रमांकावर प्राप्त झाल्यानंतर जिल्हा महिला व बालविकास अधिकारी श्रीकांत हावळे यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने पथक गठीत करून प्रतिबंधात्मक कार्यवाही करीत तत्काळ घटनास्थळी पाठवण्यात आले.

या पथकामध्ये महिला व बालविकास विभाग, संरक्षण अधिकारी, चाइल्ड हेल्पलाईन, पोलीस विभाग तसेच स्थानिक प्रशासन यांचा समावेश होता. महिला व बालविकास विभागाच्या मार्गदर्शनाखाली एम. जी. जोरकर (म्हसे) बालविवाह प्रतिबंधक अधिकारी तसेच अंगणवाडी सेविका हिरा गायकर सहाय्यक यांनी पालकांकडून बालविवाह न करण्याबाबतचा जबाबनामा घेतला.

प्रशासनाच्या समजावणीमुळे कुटुंबीयांनी विवाह थांबविण्यास सहमती दर्शविली. यानंतर मुलांचे शिक्षण व सुरक्षिततेस प्राधान्य देण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मुलांना बाल कल्याण समिती, रायगड येथे हजर करण्याच्या सूचना देण्यात आल्या. पुढील कार्यवाही बाल कल्याण समितीमार्फत करण्यात येणार आहे.

ही कार्यवाही जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीकांत हावळे यांच्या मार्गदर्शनाखाली दिप्ती रामरामे संरक्षण अधिकारी, प्रमोद पाटील, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक प्रमोद पाटील, महिला व बाल विकास प्रकल्प अधिकारी संघमित्रा आंधोरीकर, प्रकाश पवार समन्वयक चाइल्ड हेल्पलाइन, सतीश बांगर पोलीस नायक, मिथुन गुंजाळ सहाय्यक संरक्षण अधिकारी, एम. जी. जोरकर ग्रामपंचायत खरवलीचे ग्रामपंचायत अधिकारी व सुधीर नाना परबळकर पोलीस पाटील, हिरा गायकर अंगणवाडी सेविका आणि मदतनीस यांच्या समन्वयाने पार पडली.

करण्यात आलेल्या जबाबनाम्यावर कुटुंबीयांसोबत संवाद साधण्यात आला. चाइल्ड हेल्पलाईन रायगडचे प्रकल्प समन्वयक प्रकाश पवार यांनी कुटुंबीयांचे समुपदेशन करून बालविवाहाचे दुष्परिणाम तसेच कायदेशीर परिणाम याबाबत सविस्तर माहिती दिली.

## अवकाळी पावसाने लग्नसोहळ्यांवर विघ्न, वऱ्हाडी मंडळींची तारांबळ



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यासह परिसरात अचानक झालेल्या तुरळक अवकाळी पावसाने सुरू असलेल्या लग्नसराईवर मोठे संकट ओढवले आहे. विवाह सोहळ्यांत पावसाने हजेरी लावल्यामुळे अनेक ठिकाणी उभारण्यात आलेले मंडप वाऱ्यामुळे हेलकावे खात असल्याचे पाहावयास मिळाले.

सजावटीचे साहित्य, ध्वनी व्यवस्था, खानपान साहित्य तसेच विद्युत उपकरणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, आयोजकांसह वऱ्हाडी मंडळींची मोठी तारांबळ उडाली.

सध्या लग्न समारंभ सुरू असताना अवकाळी पावसाच्या सरी केव्हा बरसतील याची शाश्वती नाही. त्यामुळे आलेल्या पाहुण्यांच्या आनंदावर विरजण पडले असून, त्यातच पावसाच्या समवेत वादळी वारा हा मंडपांसाठी धोकादायक ठरत आहे. त्याचबरोबर नवरा – नवरी यांचा चांगलाच हिरमोड झाल्याचे पाहावयास मिळाले आहे. जवळजवळ पंधरा ते वीस मिनिटे या पावसासह वादळी वाऱ्याचा प्रकोपही पाहायला मिळाला.

अचानक पाऊस सुरू झाल्याने जेवणाची व्यवस्था, पूजा विधी आणि वऱ्हाडींच्या बसण्याची व्यवस्था यांचे गणित विस्कळीत झाले होते. याशिवाय मंडप डेकोरेटर्स आणि केटरिंग व्यावसायिकांचेदेखील मोठे आर्थिक नुकसान होत असल्याचे प्रकर्षाने समोर येत आहे.

## अशोकदादा साबळे विद्यालयाचे दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित अशोकदादा साबळे विद्यालय व माणगाव ज्युनिअर कॉलेज यांनी इयत्ता दहावी फेब्रुवारी/मार्च २०२६ परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करीत ९३.८३ टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. विद्यार्थ्यांच्या अथक मेहनतीला शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य लाभल्याने विद्यालयाने यंदाही गुणवत्तेचा ठसा उमटवला आहे.

यंदा विद्यालयातून एकूण १४६ विद्यार्थी परीक्षेला प्रविष्ट झाले होते. त्यापैकी १३७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून विद्यालयाचा एकूण निकाल ९३.८३ टक्के लागला आहे. २४ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवत शाळेचा मान उंचावला आहे. तसेच ४७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ४५ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत, तर २१ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यालयातून ओमकार बाळू वरपे याने ४६० गुण मिळवत ९२.६० टक्क्यांसह प्रथम क्रमांक पटकावला, तर स्वरुपा शोभा सचिन धावडे हिने ४४१ गुणांसह ८८.२० टक्के मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला. सोहम वर्षा व्यंकटलाल धर्मसाले याने ४३५ गुणांसह ८८ टक्के मिळवत तृतीय क्रमांक पटकावला. तसेच पूजा ज्योती पुंडलिक चव्हाण हिने ४३४ गुणांसह ८७.८० टक्के, तर सई प्रतिभा कुंडलिक तेटगुरे हिने ४३७ गुणांसह ८७.४० टक्के गुण मिळवत विद्यालयाच्या गुणवंत विद्यार्थ्यांच्या यादीत स्थान मिळविले.

विद्यालयाच्या यशामुळे माणगाव परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रतिकूल परिस्थितीतही मेहनत, जिद्द व चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या उल्लेखनीय कामगिरीमुळे पालकांमध्येही समाधान व अभिमानाची भावना व्यक्त होत आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचे माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे, सेक्रेटरी कृष्णा गांधी, स्कूल कमिटी चेअरमन नरेंद्र गायकवाड, मुख्याध्यापक आर. एच. पाटील, पर्यवेक्षक, उपमुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. विद्यालयाच्या सातत्यपूर्ण गुणवत्तेमुळे माणगावच्या शैक्षणिक क्षेत्रात संस्थेचा लौकिक अधिक दृढ झाला आहे.

## मोरया कला अकादमी येथे एकपात्री अभिनय स्पर्धा

**चौल : प्रतिनिधी**

मोरया कला अकादमी आयोजित ज्येष्ठ अभिनेत्री आशालता वाबगावकर यांच्या स्मरणार्थ आयोजित करण्यात आलेली एकपात्री अभिनय स्पर्धा उत्साहात संपन्न झाली. स्पर्धेचे हे पाचवे वर्ष असून चौल येथील भाटगल्ली परिसरातील मोरया कला अकादमी येथे ही स्पर्धा पार पडली. लहान गट व मोठा गट अशा दोन विभागांत झालेल्या या स्पर्धेत अनेक स्पर्धकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या अभिनय कौशल्याची झलक सादर केली.




स्पर्धेचे परीक्षण प्रसिद्ध अभिनेते पंढरीनाथ कांबळे यांनी केले. दोन्ही गटांतील विजेत्यांना रोख पारितोषिक, मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. गट क्रमांक १ मध्ये विहान अनिकेत नाईक यांनी प्रथम क्रमांक पटकावला. दुर्वा सुशांत झावरे यांनी द्वितीय तर तपस्या भानुदास पाटील यांनी तृतीय क्रमांक मिळवला. उत्तेजनार्थ पारितोषिक आराध्य पाटील यांना प्रदान करण्यात आले.

गट क्रमांक २मध्ये श्रुती नाईक यांनी प्रथम, निकिता घाग यांनी द्वितीय तर तनिष्क आपणकर यांनी तृतीय क्रमांक पटकावला. उत्तेजनार्थ पारितोषिक साक्षी कोळी यांना देण्यात आले. यामुळे बालकलाकार व युवकांना अभिनय क्षेत्रात व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

मुंबई, डोंबिवली, ठाणे, रोहा, पनवेल, नागोठणे आणि पुणे येथून स्पर्धक आले होते. त्यांच्यासाठी खाण्याची–राहण्याची उत्तम सोय करून मोरया परिवाराने या सगळ्यांना आपल्या परिवारात सामावून घेतले. आयोजक प्रकाश कवळे यांनी भविष्यातही अशा सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्याचा मानस व्यक्त केला.

## तळा तालुक्याचा निकाल ९२ टक्के

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्याचा शालांत परीक्षेचा १० वीचा ऑनलाइन निकाल ९२ टक्के लागला असून गो. म. वेदक विद्यामंदिरचा विद्यार्थी सोहम सुर्वेने ८७ % गुण मिळवून तालुक्यात प्रथम येण्याचा मान मिळवला आहे, तर अ. ल. लोखंडे विद्यामंदिर पिटसईची विद्यार्थिनी विनया शिगवण ८५% गुण मिळवून द्वितीय आली आहे.

तालुक्यातील आदर्श माध्यमिक विद्यामंदिर मांदाड, एस. एस. निकम इंग्लिश स्कूल तळा व उर्दू हायस्कूल तळा या तीन माध्यमिक शाळांचा निकाल १००% लागला आहे. वरदायिनी माध्यमिक हायस्कूल महागाव ९२.३१ %, अ. ल. लोखंडे विद्यामंदिर पिटसई ९०.६२%, श्री. गो. म. वेदक विद्यामंदिर तळा ९०.१४%, ज्ञानदीप विद्यामंदिर बोरघरहवेली ९०%, अभिनव ज्ञान मंदिर उसरखुर्द ८९.४७%, बंदरकाठा विद्यामंदिर मजगाव ७८%, डॉ. प्र. म. जोशी प्रशाळा पन्हेळी ७२.७२%, कुणबी समाज विद्यालय म्हसाडी ६२.५०% व माध्यमिक शाळा पढवण ५३.३३% असा निकाल आहे.

## सुधांशू कुमठेकर पोलादपूर तालुक्यात सर्वप्रथम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील विविध माध्यमिक शाळांच्या एसएससी परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर साने गुरूजी विद्यालय लोहारेतील सुधांशू प्रमोद कुमठेकर ९४.८० टक्के गुणांनी सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला, तर यशवंत इंग्लिश मीडियम स्कूलचा अथर्व अनिल दळवी याने ९४ टक्के गुण आणि शंकरराव महाडीक इंग्लिश स्कूलची संस्कृती संदीप जाधव हिने ९४ टक्के मिळवून तालुक्यात तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण होण्याचा मान प्राप्त केला आहे.



सुधांशू कुमठेकर पोलादपूर तालुकाप्रथम | अथर्व अनिल दळवी तालुका व्दितीय | संस्कृती संदीप जाधव तालुका व्दितीय

रयत शिक्षण संस्था सातारा संचालित विद्यामंदिर पोलादपूरचा इयत्ता १० वी मार्च २०२६ निकाल वैशिष्ठयपूर्ण असून ९४.४९ टक्के निकालामध्ये १०९ विद्यार्थी परीक्षेस बसले. त्यापैकी २२ विशेष प्राविण्य, २४ प्रथम श्रेणी, ३९ द्वितीय श्रेणी, १८ पास श्रेणी असे एकूण १०३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. तेजल किरण चव्हाण ही ९३.४०टक्के गुणांनी प्रथम, राजवीर भीमाशंकर जाधव हा९१.४०टक्के मिळवून द्विवितीय तर सारा सुहास बुटाला ही ९१.२०टक्के गुणांनी तृतीय क्रमांकाची मानकरी ठरली. संस्थेचे चेअरमन निवास शेठ व मुख्याध्यापक शिक्षकवृंदाने विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

पोलादपूर येथील श्रीशिवकृष्ण चॅरिटेबल ट्रस्ट संचालित शंकरराव गोपाळराव महाडिक इंग्लिश मीडियम स्कूलचा यंदाही दहावीचा १०० टक्के निकालाची परंपरा कायम ठेवून सर्व विद्यार्थ्यांनी यश संपादन करून उत्तीर्ण झाले आहेत. यामध्ये संस्कृती संदीप जाधव ९४ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. स्वरूपा विजय महाडिक ८७.२०टक्के गुण मिळवून द्वितीय क्रमांक तर सांची चंद्रकांत मोरे ७४.२०टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला आहे. उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे शाळेचे संस्थापक शंकरराव महाडिक, अध्यक्षा मंगलाताई महाडिक, उपाध्यक्ष बाबुराव महाडिक, मनोज महाडिक तसेच मुख्याध्यापक, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

तानाजी शेलारमामा प्रशाला उमरठ प्रशालेचा १०० टक्के निकाल लागला असून प्रणिता रुपेश कळंबे ८६.२० टक्के, कार्तिकी विठोबा कळंबे ७६.६० टक्के, पियूष रमेश मोरे ७४.२० टक्के हे पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थी आहेत. न्यू इंग्लिश स्कूल ओंबळी शाळेचा निकाल १००टक्के लागला असून रोहित प्रदिप कदम ६४.४० टक्के, वेदांत विष्णू कालप ६१.८०टक्के, सुनिता पांडूरंग बर्गे – ६१.४०टक्के गुणांनी पहिल्या तीन क्रमांकाचे मानकरी ठरले आहेत. माध्यमिक विद्यालय, सवाद येथे १०० टक्के निकाल लागला असून रिध्दी परशुराम लाड ७९.८० टक्के, सिध्दी काशिनाथ म्हस्के ७७.४० टक्के, हर्षल संतोष निकम ७७टक्के गुणांनी पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण झाले. श्री वरदायिनी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कापडे बुद्रुकचा एकूण निकाल ९८.४१ टक्के लागला असून वेदांत कृष्णा अजगणकर ८८.४०टक्के गुणांनी प्रथम, सानिका सुधिर कदम ८८.२०टक्के गुणांनी द्विवतीय तर अथर्व नरेश सलागरे८८.०टक्के आणि सिध्दी पांडुरंग घोलप ८८.०टक्के गुणांनी तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले. कांगोरीगड माध्यमिक विद्यालय मोरसडेचा निकाल १०० टक्के लागला असून नियती राजेश उतेकर हिला ८१.८०टक्के, वीर लक्ष्मण घोलप याला ८१.२०टक्के तर यश यशवंत कदम यास ७७.००टक्के गुण मिळून तिघे विद्यालयामध्ये पहिल्या तीन क्रमांकाचे मानकरी ठरले. माध्यमिक विद्यालय साखर मध्ये भावेश विश्वनाथ चव्हाण ८७.४०टक्के, कल्याणी संजय शिर्के ८६.८०टक्के आणि आर्यन शशिकांत सुतार ७८.२०टक्के गुणांनी पहिल्या तीन क्रमांकानी उत्तीर्ण झाले.

पळचील विद्यालयातील गौरी सुधीर कदम ७१.८०टक्के, वैष्णवी कृष्णा सकपाळ ६२.६०टक्के आणि आकांक्षा दीपक सुतार ५५टक्के या पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण विद्यार्थिनी ठरल्या. साने गुरुजी विद्यालय, लोहारेचा १००टक्के निकाल लागला असून सुधांशू प्रमोद कुमठेकर – ९४.८०टक्के हा तालुक्यासह विद्यालयात सर्वप्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला. अनिकेत संजय पालकर ८४.६० टक्के गुणांनी द्विवतीय आणि अंकिता संजय पालकर ही ८४ टक्के मिळवून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. माऊली प्रशाला कोतवाल बुद्रुकमध्ये माधूरी संतोष बर्गे ७७.६० टक्के गुणांनी प्रथम, श्रेया आत्माराम जाधव ७६.४०गुणांनी द्विवतीय तर प्रिया विजय सकपाळ ७४.४० टक्के गुणांनी तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

यशवंत इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये अथर्व अनिल दळवी ९४ टक्के गुणांनी सर्वप्रथम आला असून तालुक्यात दुसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला. कस्तुरी हेमंत साने ही ९३.२०गुणांनी द्विवतीय तर अथर्व सुशांत मोपेरकर ९२.२० टक्के गुणांनी तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाला. न्यू इंग्लिश स्कूल तुर्भेचा निकाल १०० टक्के लागला असून अक्षता पंकज पवार ही ७८.६० टक्के गुणांनी प्रथम, श्रावणी नयन उतेकर ही ७७.४० टक्के गुणांनी द्विवतीय तर समीक्षा तानाजी भिलारे ही ७५.८०टक्के गुणांनी तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली. गोळेगणी न्यू इंग्लिश स्कूलचा निकाल ८८.८८ टक्के लागला असून श्रावणी सतीश मोरे ६६.४०टक्के, वैष्णवी दिलीप चिकणे ६४.४० टक्के, रसिका किसन शिंदे ६३.८० टक्के गुणांनी पहिल्या तीन क्रमांकाचे मानकरी ठरले. श्रीराम विद्यालय लोहारेचे श्वेता संदीप साळुंखे ९३.६० टक्के प्रथम, ज्ञानेश्वरी राकेश उतेकर ८३.८० टक्के आणि स्वाती महादेव नाटकर ८३ टक्के या तिघी अनुक्रमे पहिल्या तीन क्रमांकाने उत्तीर्ण झाले. पैठण हायस्कूलचे दोनपैकी दोन विद्यार्थी उत्तीर्ण होऊन १०० टक्के निकाल लागला आहे.

## खालापूर येथे नव्याने स्वामी समर्थ महाराज मठाची स्थापना

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर येथे खालापूर व परिसरातील स्वामी समर्थ भक्तांनी नवीन मठाची उभारणी केली असून मंदिर स्थापत्य कलेचा नवीन आविष्कार घडवला आहे. या मठाचे काम पूर्ण झाले आहे.



शनिवार ९ ते १४ मेपर्यंत विविध धार्मिक विधींच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मठाची पूजा, ध्वज स्थापना, मूर्ती स्थापना, अभिषेक, पूजा, विविध धार्मिक कार्यक्रम या दिवसांत आयोजित करण्यात आले असून सहा दिवस सुरू असणाऱ्या या धार्मिक कार्यक्रमाला सहकुटुंब उपस्थित राहून स्वामींचा आशीर्वाद घ्यावा, अशी विनंती मठाच्या कार्यकारी मंडळाने केली आहे.


### जाहीर नोटीस

सर्व तमाम लोकांस जाहीर नोटीसीने असे कळविणेत येत आहे की, मौजे-वाजापुर, ता-पनवेल, जि-रायगड, येथील खाली वर्णन केलेल्या व्यक्तीच्या मालकी हक्काची, मिळकत वा जमीन ही आमचे आशिलांनी कायमस्वरूपी विकण्याचे ठरविले आहे. तरी, सदरहू मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर प्रसिध्द करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन येणेप्रमाणे:

-मिळकतीचे वर्णण-
मौजे: वाजापुर, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड

| गाव | भोगवटदारांचे नाव | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकाराणी रू.पै. |
|---|---|---|---|---|
| वाजापुर | **१. जाजु विमल सुरेश**<br>२. **जाजु अंकिता सुरेश**<br>**३. जाजु सुरेश के.**<br>**४. काब्रा सिप्रा सुमित**<br>सर्व रा.१ दिनार, चौथा मजळा, स्टेशन रोड, सांताक्रुज, मुंबई (प.), ५४ | १८/० | **४.०८.००**<br>**४.०९.००**<br>**८.१७.००**<br>**पैकी**<br>**२.०८.००**<br>**४.०९.००**<br>**६.१७.००**<br>**इतके**<br>**विक्री क्षेत्राचे** | **६.६९**<br>**पैकी**<br>**३.४१** |

सदरहू जागा, जामिन व मिळकतीसंबंधी अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचे गहाण, दान, बक्षीस, लिज, पोटगी, कोर्ट जप्ती, अगर अन्य कोणत्याही प्रकारचे इजमेंट, दावे, फरोक्त, वचनचिठ्ठी, खरेदीखत, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, लिज, साठेकरार, कुलमुखत्यारपत्र, करार-मदार, हक्क, हितसंबंध असलेल्या व्यक्तींना, इतर वारसांचा वा संबंधीतांना ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून २१ दिवसांच्या आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह खालील पत्त्यावर, समक्ष तथा रजिस्टर पोस्टाने लेखी कळवावे. जर वरील मुदतीत कोणाकडूनही काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास वरील मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही किंवा असल्यास सदर हरकती, तक्रारी रद्दबातल आहेत किंवा त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून आमचे आशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजीत व्यवहार पूर्ण करतील व विहीत मुदतीच्या न येणा-या कोणत्याही हरकती/तक्रारी आमचे अशिलावर बंधनकारक असणार नाहीत याची संबंधीतांनी नोंद घ्यावी.

ठिकाण: पनवेल
दिनांक: ०९/०५/२०२६

सही/-
**ॲड. चित्तरंजन सुधाकर लाड**
पत्ता-०३, श्री हरेकृष्णा को.ऑ.सोसायटी, प्लॉट नं.१२, सेक्टर ०५, नविन पनवेल ता.पनवेल जि.रायगड ४१०२०६
**मो. क्र. ९६९९४९९९६३**



### पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

**पशुवैद्यकीय विभाग**

**जाहीर सुचना**

पनवेल महानगरपालिका हद्दीमध्ये भटके श्वान (कुत्रे)/ मांजराचे निर्बिजीकरण करणेकामी मनुष्यबळ आधारित नव्याने प्रस्ताव तयार करणेकामी बाजारभाव दरपत्रक मागविण्यात येत आहे. इच्छुकांनी सदरचे बाजारभाव दरपत्रक दिनांक १६/०५/२०२६ रोजी सायं ४.०० वाजेपर्यंत महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडे समक्ष सादर करावीत. सदर दिनांक नंतर प्राप्त झालेले दरपत्रके विचारात घेतले जाणार नाही. या जाहीर सुचना बाबत चा सविस्तर तपशील पनवेल महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**सही/-**
**उपायुक्त**
**पनवेल महानगरपलिका**



### जाहीर प्रगटन

**मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उरण यांचे न्यायालय उरण, ता.उरण, जि. रायगड**

चौकशी अर्ज क्र. २८४/२०२६

सौ. अनिता महेश सोनार (लग्नानंतरचे नाव)
अनिता भुवन कोळी (लग्नाअगोदरचे नाव), ............... अर्जदार
रा. मोरा कोळीवाडा, ता.उरण, जि. रायगड

**विरूध्द**

मुख्याधिकारी,
उरण नगरपरिषद उरण,
ता. उरण, जि.रायगड. ......... सामनेवाला

तमाम लोकांस या जाहीर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार सौ. अनिता महेश सोनार (लग्नानंतरचे नाव)/ अनिता भुवन कोळी (लग्नाअगोदरचे नाव), यांनी मा. कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार उरण यांचे न्यायालयात त्यांची जन्माची नोंद उपलब्ध नसल्याने दिवस ठरवून मिळण्याकरीता अर्ज दाखल केलेला आहे. तरी दिनांक ११/०८/१९७६ रोजी राहत्या घरी मौजे. मोरा कोळीवाडा, ता.उरण येथे जन्म झालेला आहे असे अर्जात नमूद केलेले आहे. अर्जदार यांनी उक्त नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयात होणेकरीता आदेश मिळणेकामी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे.

तरी सौ. अनिता महेश सोनार (लग्नानंतरचे नाव)/ अनिता भुवन कोळी (लग्नाअगोदरचे नाव), हीच्या जन्माच्या नोंदीबाबत कोणासही हरकत, घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेल्या तारखेपासून १५ दिवसाचे आत लेखी अथवा तोंडी हरकती मा. न्यायालयाकडे योग्य त्या पुराव्यासह सादर कराव्यात.

याव्दारे असे जाहीर करण्यात येते की, हा कालावधी संपण्याच्या अगोदर योग्य त्या हरकती प्राप्त झाल्या नाहीत तर सौ. अनिता महेश सोनार (लग्नानंतरचे नाव)/ अनिता भुवन कोळी (लग्नाअगोदरचे नाव), हीच्या जन्माची नोंद सामनेवाला यांच्या कार्यालयास घेणेकामी त्यांना आदेश पारीत करणेंत येतील. तदनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घेणेंत यावी.

आज दिनांक ०७/०५/२०२६ रोजी मे. कोर्टाच्या सही शिक्यानिशी देण्यात आली.

**सही/-**
**(डॉ. उध्दव कदम)**
**कार्यकारी दंडाधिकारी**
**तथा तहसिलदार उरण**

# मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत ३ जूनला बोधगयेसाठी विशेष ट्रेन

## ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवासाची संधी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी सुरू करण्यात आलेल्या मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजनेला मोठा प्रतिसाद मिळत असून, या योजनेअंतर्गत आगामी ३ जून २०२६ रोजी महाबोधी गया मंदिर, बोधगया (बिहार) या तीर्थक्षेत्रासाठी विशेष ट्रेनची व्यवस्था करण्यात आली आहे. मुंबई विभागातील पात्र ज्येष्ठ नागरिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे प्रादेशिक उपायुक्त बाळासाहेब सोळंकी यांनी केले आहे.



या योजनेमुळे राज्यातील ६० वर्षे किंवा त्यावरील वयोगटातील नागरिकांना हक्काची आणि सुरक्षित तीर्थयात्रा मोफत करणे शक्य झाले आहे. राज्य शासनाने ज्येष्ठ नागरिकांच्या आध्यात्मिक , राबविण्यास मान्यता दिली आहे. या योजनेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे पात्र ठरणार्या लाभार्थ्यांचा प्रत्यक्ष प्रवास, निवास आणि भोजनाचा संपूर्ण खर्च शासनामार्फत केला जाणार आहे. त्यामुळे आर्थिक परिस्थितीअभावी तीर्थयात्रेपासून वंचित राहणाऱ्या वृद्धांसाठी ही योजना मोठा आधार ठरत आहे. नियमांनुसार, एका पात्र व्यक्तीला या योजनेचा लाभ आयुष्यातून एकदाच घेता येणार असून, दि. ३ जून २०२६ रोजी सुटणारी ट्रेन ही थेट बिहारमधील बोधगया या जगप्रसिद्ध बौद्ध आध्यात्मिक केंद्राकडे रवाना होणार आहे.

या तीर्थयात्रेचा लाभ घेण्यासाठी काही महत्त्वाच्या अटींचे पालन करणे आवश्यक आहे. अर्जदार व्यक्ती ही महाराष्ट्र राज्याची मूळ रहिवासी असणे बंधनकारक असून, तिचे वय ६० वर्षांपेक्षा जास्त असावे. तसेच लाभार्थ्याच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न २ लाख ५० हजार रुपयांच्या मर्यादेत असणे आवश्यक आहे. मुंबई विभागांतर्गत येणाऱ्या मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, पालघर, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग या सातही जिल्ह्यांमध्ये ही योजना प्रभावीपणे राबवण्यात येत असून, स्थानिक समाज कल्याण कार्यालये अर्जांची छाननी आणि पुढील प्रक्रियेसाठी सज्ज झाली आहेत. मुंबई विभागातील ज्या ज्येष्ठ नागरिकांना बोधगया येथे जाण्याची ओढ आहे, त्यांनी विनाविलंब आपल्या जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधून आपली नोंदणी पूर्ण करावी. या यात्रेच्या माध्यमातून जास्तीत जास्त नागरिकांनी शासनाच्या मोफत सुविधेचा लाभ घेऊन आपले तीर्थयात्रेचे स्वप्न पूर्ण करावे, असे आवाहन बाळासाहेब सोळंकी यांनी केले आहे.

# उरण न्यायालयासमोर पडक्या इमारतीत गांजाची नशा

## पोलिसांचा छापा, चौघांवर गुन्हा दाखल

**उरण : बातमीदार**

उरण शहरात न्यायालयाच्या अगदी समोरच अलिबाग वन विभागाच्या वापरात नसलेल्या पडक्या इमारतीत गांजा ओढणाऱ्या चौघा तरुणांना उरण पोलिसांनी शनिवारी दुपारी रंगेहाथ पकडले. या कारवाईमुळे उरणमधील निर्जन व पडक्या इमारती नशेबाजांचे अड्डे बनत असल्याचे पुन्हा एकदा समोर आले असून नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. या प्रकरणी उरण पोलीस ठाण्यात ग अंमली पदार्थ विरोधी कायदा नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

३ मे २०२६ रोजी दुपारी १२:३५ वाजताच्या सुमारास उरण कोर्टाच्या समोर असलेल्या अलिबाग वन विभागाच्या जुन्या, पडक्या इमारतीत काही तरुण अंमली पदार्थांचे सेवन करत असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली. माहिती मिळताच पोउपनि गोविंद केंद्रे व पथकाने घटनास्थळी छापा टाकला. त्यावेळी सौरभ बिस्वनाथ प्रामाणीक, वय ३०, उरण कोर्ट जवळ; हर्षल विनायक भोईर, वय २४, रा. नवीन शेवा; हेमंत बबन कोळी वय ३२ रा. हनुमान कोळीवाडा; आणि जुगल लक्ष्मण पाटील,



वय २३, रा. केगाव आवेडा हे चौघेजण 'गांजा' या अंमली पदार्थाचे सेवन करताना आढळले. पोलिसांनी चौघांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. मात्र, चौघांनाही नोटीस देऊन सोडण्यात आले आहे.

न्यायालयासारख्या महत्त्वाच्या ठिकाणासमोरच दिवसाढवळ्या नशा केली जात असल्याने कायद्याचा धाक राहिला आहे का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत. पडक्या सरकारी इमारतींची डागडुजी करावी किंवा त्यांना कुलूप लावून संरक्षित करावे, जेणेकरून त्या गुन्हेगारांचे आश्रयस्थान बनणार नाहीत, अशी मागणी होत आहे.

# एसएससीच्या १००% निकालाची विद्याभवनची २३ वर्षांची परंपरा

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थीगृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलाचा एसएससी बोर्ड परीक्षेचा १००% निकाल लागला असून सतत शंभर टक्के निकाल लागण्याचे हे तेवीसावे वर्ष आहे. फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या बोर्ड परीक्षेचा निकाल नुकताच ऑनलाइन जाहीर करण्यात आला. विद्याभवनच्या रौप्य महोत्सवी वर्षात १००% निकालाची ही गौरवशाली परंपरा यशस्वीपणे कायम राखली गेली आहे.

सर्वेश अर्जुन पाटील याने ९५.४० टक्के मिळवून इंग्रजी माध्यमातून प्रथम येण्याचा बहुमान पटकावला. सुहानी प्रसन्नकुमार कांबळे आणि शिवकृष्ण किशोरकुमार पुचा यांनी अनुक्रमे ९४.४०% व ९३.००% मिळवून द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. सेमी इंग्रजी माध्यमातून रुद्र किरण जाधव याने ९१.८०%गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. आयुष लक्ष्मण आनेकर आणि मधुरा प्रशांत तरकसबंद या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे ९१% व ८९.८०% गुण मिळवत द्वितीय व तृतीय स्थान प्राप्त केले.

पुणे विद्यार्थी गृह कार्याध्यक्ष राजेंद्र बोऱ्हाडे,उपकार्याध्यक्ष सुभाष जिर्गे,अमोल जोशी, कार्यवाह संजय गुंजाळ, कोषाध्यक्ष कृष्णाजी कुलकर्णी कुलसचिव दिनेश मिसाळ, सर्व संस्था पदाधिकारी व संचालक मंडळ तसेच शाळेचे सर्व मुख्याध्यापक, समन्वयक ,पर्यवेक्षक, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी आणि पालकांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# नवी मुंबई महानगरपालिकेच्या २३ शाळांचा निकाल ९२.१९%


## सानपाडा शाळेचा विद्यार्थी अभिराम राऊत ९४.४०% गुण मिळवून सर्वप्रथम

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उचच माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता २० फेब्रुवारी ते १८ मार्च २०२६ या कालावधीमध्ये माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा अर्थात इयत्ता दहावीच्या परीक्षांचे आयोजन करण्यात आले होते. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्व माध्यमाच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांमधून विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली.

मंडळाच्या विहीत कार्यपध्दतीनुसार दहावी परीक्षेचा निकाल आज शुक्रवार दि. ८ मे २०२६ रोजी जाहीर झाला असून या परीक्षेत नवी मुंबई महानगरपालिका संचालित २३ माध्यमिक शाळांमधून २४९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. महानगरपालिकेच्या २३ शाळांपैकी नवी मुंबई महानगरपालिका माध्यमिक शाळा क्रमांक १२० दिवा (काचेची शाळा) या शाळेचा १००% निकाल लागलेला आहे. नमुंमपा शाळेतील २७०३ विद्यार्थी माध्यमिक शालांत परीक्षेमध्ये सहभागी झाले होते, त्यापैकी २४९२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून, एकूण निकाल ९२.१९ % एवढा लागलेला आहे.

यामध्ये नमुंमपा शाळा क्र. ११६ सानपाडा (मराठी माध्यम ) मधील विद्यार्थी कु. अभिराम मनोजकुमार राऊत ९४.४० टक्के गुण संपादन करून नवी मुंबई महानगरपालिकेच्या



शाळांमध्ये सर्वोत्तम गुणांनी उत्तीर्ण झालेला आहे. त्याचप्रमाणे नमुंमपा शाळा क्र. १२०, दिवा ऐरोली (इंग्रजी माध्यम) मधील विद्यार्थिनी कु. रिया राकेश कहार ही ९३.४० % गुण संपादन करून नमुंमपा शाळांमधून व्दितीय तसेच कु.श्रावणी संदीप गालवे ही नमुंमपा शाळा क्र. ११८ पावणे (मराठी माध्यम) शाळेतील विद्यार्थिनी ९३.२० % गुण संपादन करून नवी मुंबई महानगरपालिका शाळांतून तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेली आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या २३ माध्यमिक शाळांतून गुणानुक्रमे पहिल्या तीन क्रमांकाने यशवंत झालेल्या या विद्यार्थ्यांप्रमाणेच दहावीच्या शालांत परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे महापौर श्रीम.सुजाता पाटील, उपमहापौर श्री.दशरथ भगत, आयुक्त डॉ.कैलास शिंदे, सभापती स्थायी समिती श्री.अशोक पाटील, सभागृह नेते श्री.सागर नाईक, विरोधी पक्षनेते श्री.विजय चौगुले यांनी अभिनंदन केले आहे व पुढील वाटचालीसाठी भरभरून शुभेच्छा दिल्या आहेत. महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांनी केलेल्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल यशस्वी विद्यार्थ्यांचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

महानगरपालिका शिक्षण विभागामार्फत सर्व महानगरपालिका शाळेला २१ मार्गदर्शक अपेक्षित संच पुरविण्यात आले होते. दिवाळीच्या सुट्टीत तसेच शाळा सुटल्यानंतर दररोज एक तास विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन करण्यात आले. त्याचप्रमाणे सर्व शाळांला सराव प्रश्नसंच उपलब्ध करुन देण्यात आले होते. या प्रश्नसंचाचा उपयोग करुन शालेय स्तरावर नियमितपणे सराव परीक्षांचे आयोजन करण्यात आले. शाळा स्तरावर मुख्याध्यापक व शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी घेतलेल्या मेहनतीमुळे हे यश प्राप्त झाले.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली, अतिरिक्त आयुक्त श्री.सुनील पवार, शिक्षण विभागाच्या उपआयुक्त श्रीम. संघरत्ना खिल्लारे यांच्या नियंत्रणाखाली, शिक्षाधिकारी श्री.अशोक कडुस, सर्व केंद्र समन्वयक यांनी सातत्यपूर्ण आढावा घेत महानगरपालिकेचे शिक्षण व्हिजन यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. त्याचे फलित म्हणजे महानगरपालिका शाळांचा हा उत्तम निकाल असून सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

# नागरिकांच्या सुरक्षेसाठी मनपाने बसविले लोखंडी पाईप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नेरूळ (पश्चिम) परिसरातील विविध ठिकाणी असलेल्या फुटपाथवर दुचाकी आणि चार चाकी वाहन चालक सर्रास आपली वाहन चालवत असल्याने पादचाऱ्यांना जीव मुठीत घेऊन चालावे लागत होते. पादचारी आणि जॉगिंग करणाऱ्या नागरिकांना अपघात होण्याचा धोका अधिक असल्याने सदर ठिकाणी लोखंडी पाईप (बोलार्ड) बसवावेत जेणे करून वाहने फुटपाथ वरून चालणार नाहीत.अशी मागणी नागरिकांनी नवी मुंबई मनपा प्रशासनाकडे केली होती. त्यांच्या मागणीची दखल मनपा प्रशासनाने घेत विविध ठिकाणी लोखंडी पाईप बसवले असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.




नेरूळ ( पश्चिम) मधील विक्रम हॉटेल परिसर, सी.यू.व्ही. सोसायटी, शिव पाम बीच टॅक्सी स्टँड, त्रिमूर्ती वाचनालय , जेष्ठ नागरिक बैठक व्यवस्था आदी परिसरातील फुटपाथवरून सर्रास दुचाकी आणि चार चाकी वाहन चालक आपली वाहन चालवत असतात. विशेष म्हणजे सकाळी आणि संध्याकाळी जेष्ठ नागरिक, गरोदर महिला, लहान मुले फुटपाथ वरून चालत असल्याने मोठ्या प्रमाणात इथ वर्दळ असते. मात्र यांचेही भान या वाहन चालकाना नसते. फुटपाथ हा पादचारी नागरिकांसाठी निर्माण केलेला असून त्याच्यावर ये-जा करणे त्यांचा अधिकार आहे, असे असताना फुटपाथ वरून चालणाऱ्या नागरिकांना वाहनाचा वेग चुकवत चालावे लागत आहे. सदर बाब दिलिप आमले यांच्या लक्षात आल्यावर नवी मुंबई मनपा प्रशासना कडे लेखी निवेदनात देऊन सदर ठिकाणी नागरिकांना सुरक्षितपणे आणि वाहनांची भीती न बाळगता चालता यावे म्हणून तत्काळ उपाययोजना करण्यात यावी अशी मागणी केली होती.

या निवेदनाची तात्काळ दखल घेत नवी मुंबई महानगरपालिकेच्या वार्ड अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी संबंधित ठिकाणी लोखंडी पाईप (बोलार्ड) बसवून फुटपाथ सुरक्षित केला.या उपाययोजने मुळे जेष्ठ नागरिक, महिला, गरोदर स्त्रिया तसेच शाळकरी मुलांना सुरक्षितपणे फुटपाथ वरून चालता येणार आहे. लोखंडी पाईप बसवल्याने अपघाताचा धोका कमी झाला असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# ११ मे रोजी विभागीय लोकशाही दिन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

कोकण विभागीय स्तरावरील लोकशाही दिन सोमवार दि. ११ मे,२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता कोकण भवनातील विभागीय आयुक्त कार्यालयाच्या समिती सभागृह, १ ला मजला, कोकण भवन, नवी मुंबई येथे आयोजित करण्यात आला आहे. लोकशाही दिनाच्या बैठकीस सर्व विभागीय स्तरावरील प्रमुख अथवा त्यांचे प्रतिनिधी यांनी उपस्थित असणे आवश्यक आहे. काही अपरिहार्य कारणामुळे उपस्थित राहणे शक्य नसल्यास त्यांनी विभागीय आयुक्तांची परवानगी घेणे गरजेचे आहे, असे कोंकण विभागाचे अपर आयुक्त फरोग मुकादम यांनी कळविले आहे.

# बेघर निवारा केंद्राला भेट देत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांचा बेघरांशी संवाद

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिका संचालित घणसोली येथील बेघर निवारा केंद्रास आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी भेट देत तेथील व्यवस्थेची पाहणी केली आणि तेथे असलेल्या बेघर स्त्री, पुरूष नागरिकांशी संवाद साधत उपलब्ध सुविधांमध्ये वाढ करण्याचे निर्देश दिले.

यावेळी आयुक्तांसमवेत अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, समाजविकास विभागाचे उपआयुक्त सोमनाथ पोटरे, घनकचरा व्यवस्थापन विभाग उपआयुक्त डॉ.अजय गडदे, उद्यान विभाग उपआयुक्त स्मिता काळे व इतर अधिकारी उपस्थित होते.



यावेळी आयुक्तांनी महिला व पुरूष कक्षामधील बेघर नागरिकांशी संवाद साधत त्यांची आस्थेने विचारपूस केली. त्यांच्या खानपान व्यवस्थेचीही पाहणी केली तसेच त्यांची आरोग्य तपासणी वेळेच्या वेळी केली जात असल्याबद्दल माहिती घेतली.

याठिकाणी असलेल्या बेघर व्यक्तींना त्यांच्या आवडीनुसार विविध कलागुण जोपासण्याच्या दृष्टीने शिलाईकाम तसेच कलाकुसरीच्या कामाची संधी उपलब्ध करून द्यावी तसेच वाचण्यासाठी पुस्तकांची सुविधा उपलब्ध करून द्यावी असे निर्देश आयुक्तांनी दिले. निवारा केंद्राच्या दर्शनी भागात पावसाळ्यापूर्वी शेड तयार करून घ्यावा तसेच बसण्यासाठी बेंच उपलब्ध करून द्यावेत, अशाही सूचना त्यांनी केल्या.

# वाशी रुग्णालयातील एमआरआय सेंटरची आयुक्तांनी केली पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईकर नागरिकांना आवश्यक आरोग्य सुविधा पुरवितानाच महत्वाच्या चाचण्यांसाठी वाशी सार्वजनिक रुग्णालयामध्ये एमआरआय सुविधा काही दिवसातच उपलब्ध करुन दिली जात आहे. त्या सुविधेची पाहणी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी अतिरिक्त आयुक्त श्री.सुनिल पवार व संबधित अधिकारी यांचेसह केली.

मेंदू आणि मज्जासंस्था, पाठीचा कणा आणि सांधे, हृदय यकृत मूत्रपिंड स्वादुपिंड असे अंतर्गत अवयव, कर्करोग, रक्तवाहिन्यांचे आजार अशा विविध आजारांच्या निदानासाठी एमआरआय चाचणी अत्यंत महत्वाची मानली जाते. साधारणतः १५ हजारापासून अधिक खर्च असलेली ही महाग चाचणी नागरिकांना अत्यंत सवलतीच्या दरात उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

आरोग्य सेवा सुधारणा व सक्षमीकरण उपक्रमांतर्गत अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज थ्री टेस्ला मशीन नवी मुंबई महानगरपालिकेने खरेदी केली असून ही सुविधा बाहययंत्रणेव्दारे चालविली जाणार आहे. वाशी रुग्णालयात सुरु होणाऱ्या या एमआरआय सुविधेला मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन इतरही रुग्णालयांमध्ये ही सुविधा सुरु करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्यात येईल असे या पाहणी दौऱ्यादरम्यान आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी सूचित केले.

# ‘विद्यार्थ्यांची प्रलंबित शिष्यवृत्ती तत्काळ जमा करा’

**नवी मुंबई : प्रतिनिधी**


२०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील अनेक विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती अद्याप त्यांच्या बँक खात्यात जमा झालेली नसल्याने पालक व विद्यार्थ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत शिवसेना शिंदे गटाचे महादेव पवार यांनी नवी मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना निवेदन देऊन तत्काळ कारवाईची मागणी केली आहे.शिष्यवृत्तीच्या विलंबामुळे अनेक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, फी तसेच इतर आवश्यक खर्च भागवण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. तसेच आर्थिक परिस्थिती हलाखीची असलेल्या कुटुंबांवर याचा गंभीर परिणाम होत आहे.

# नवी मुंबई महापालिकेत लघुलेखकांच्या बदलीत अनियमितता

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महानगरपालिकेत लघुलेखक (स्टेनोग्राफर) संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदली प्रक्रियेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. इतर सर्व संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या नियमानुसार व वेळेवर होत असताना, लघुलेखक संवर्गातील अनेक कर्मचारी वर्षानुवर्षे एकाच विभागात कार्यरत असल्याचे समोर आले आहे.

माहितीनुसार, बदलीचे आदेश निघाल्यानंतरही काही कर्मचारी नव्या ठिकाणी रुजू न होता विविध मार्गांनीवशिला किंवा आर्थिक प्रभावबदली रद्द करून पुन्हा त्याच विभागात कार्यरत राहतात. यामुळे प्रशासनाच्या पारदर्शकतेवर प्रश्न निर्माण होत आहेत. लघुलेखक संवर्गाचे मूळ काम म्हणजे विविध बैठकींचे इतिवृत्त (मिनिट्स) तयार करणे. मात्र प्रत्यक्षात अनेक लघुलेखक इतर विभागांत ‘आवक-जावक’ सारखी लिपिकीय कामे करत




असल्याचे चित्र दिसत आहे.

परिणामी, ज्या विभागात त्यांच्या कौशल्याची खरी गरज आहे, तिथे मनुष्यबळाची कमतरता भासत आहे. नुकत्याच पार पडलेल्या महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर महासभा, स्थायी समिती, परिवहन समिती, प्रभाग समिती आदी विविध बैठकींचे इतिवृत्त तयार करण्याचे काम वाढले आहे. परंतु सचिव विभागात वरिष्ठ लघुलेखकांची कमतरता असल्यामुळे हे काम कनिष्ठ कर्मचाऱ्यांवर टाकले जात असून त्यांच्यावर कामाचा प्रचंड ताण निर्माण झाला आहे.

शासनाच्या २१ ऑगस्ट २०१७ च्या निर्णयानुसार सचिव विभागासाठी उच्च श्रेणीतील १ आणि निम्न श्रेणीतील ५ असे एकूण ६ लघुलेखक पदे मंजूर आहेत. तरीही प्रत्यक्षात हे कर्मचारी इतर विभागात कार्यरत असल्याने सचिव विभागाचे कामकाज अडचणीत आले आहे. या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांमध्ये नाराजीचे वातावरण असून, “ज्या विभागात ज्या पदांची गरज आहे, तिथे तातडीने पदस्थापना करून कामकाज सुरळीत करावे,” अशी मागणी जोर धरत आहे. प्रशासनाने या गंभीर बाबीकडे वेळीच लक्ष न दिल्यास, महत्त्वाच्या शासकीय कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

नवी मुंबई महानगरपालिकेमध्ये कार्यरत असलेल्या लघुलेखक संवर्गातील कर्मचाऱ्यांची अंदाजे संख्या पुढीलप्रमाणे आहे :निवडश्रेणी लघुलेखक ०१,उच्चश्रेणी लघुलेखक ०४,निम्नश्रेणी लघुलेखक १३,लघु टंकलेखक ०१,लघु टंकलेखक (करार पद्धतीवरील) ०१सचिव विभागाकरिता शासनाच्या दिनांक २१ ऑगस्ट २०१७ रोजीच्या मंजूर आकृतिबंधानुसार ०१ उच्चश्रेणी लघुलेखक व ०५ निम्नश्रेणी लघुलेखक अशी एकूण ०६ वरिष्ठ लघुलेखक पदांची मान्यता असताना, सद्यस्थितीत सचिव विभागात केवळ ०३ लघुलेखक कार्यरत आहेत.

त्यामुळे सचिव विभागामध्ये कामाचा प्रचंड ताण निर्माण झाला असून, कार्यरत कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त व तिव्र कामाचा भार पडत आहे. परिणामी कार्यालयीन कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सचिव विभागातील कामकाज सुरळीत व कार्यक्षम पद्धतीने पार पाडण्यासाठी मंजूर आकृतिबंधानुसार रिक्त पदे तातडीने भरणे आवश्यक आहे.

# बियाणांचा पुरवठा सुरळीत होण्याची दक्षता घ्यावी!

## मंत्री भरत गोगावले यांचे निर्देश



**रायगड : जिमाका**

आगामी खरीप हंगाम लक्षात घेता बियाणे, खते, कीटकनाशके आदी निविष्ठा सर्वत्र उपलब्ध असण्याच्या दृष्टीने परिपूर्ण नियोजन करा तसेच कोणत्याही परिस्थितीत खते, बियाणे यांची टंचाई भासणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी, असे निर्देश रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांनी दिले. जिल्हा नियोजन भवन सभागृहात आयोजित खरीप हंगाम आढावा बैठकीत रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले बोलत होते. या बैठकीला आमदार महेंद्र दळवी, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, सभापती वैकुंठ पाटील, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, अतिरिक्त मुख्य कार्यकारी डॉ. रूपाली सातपुते, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे आदी उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मंत्री भरत गोगावले म्हणाले की, खरीप हंगामामध्ये बियाणे आणि खतांचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर जाणवतो. त्यामुळे या दोन्हीचे नियोजन आवश्यक आहे. पीक पेरणी क्षेत्राला आवश्यक असणाऱ्या बियाणांची उपलब्धता होण्यासाठी कृषी विभागाचे नियोजन महत्त्वाचे ठरणार आहे. गुणनियंत्रण विभागाने दक्ष राहून बोगस बियाणे, खतांची विक्री होणार नाही याबाबतची दक्षता घ्यावी, अशा सूचना मंत्री भरत गोगावले यांनी दिल्या. रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांप्रमाणे रायगड जिल्ह्यातील आंबा बागायतदारांचे पंचनामे पूर्ण करण्याची कार्यवाही तातडीने करावी. शेतकरी हवालदिल झाला असून त्यांना दिलासा देण्यासाठी योग्य त्या उपाययोजना कराव्यात. कोकणातील शेतकरी छोटा असून त्यांना लागणाऱ्या सोयी-सुविधा देणे आपली जबाबदारी आहे, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्ह्यात भात व नाचणी पिकांच्या वाढीसाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहित करावे. पुढच्या भावी पिढीसाठी काही करायचे असेल तर आपल्याला मेहनत करणे काळाची गरज आहे. वन्यप्राण्यांपासून शेतीचे संरक्षण करण्याकरिता जिल्हा परिषद सेसमधून अनुदान दिले जाते. या अनुदानाचे योग्य ते नियोजन करून शेतकऱ्यांच्या शेतीचे वन्यप्राण्यांपासून होणारे नुकसान कसे टाळता येईल ते पाहावे. वन्यप्राण्यांपासून संरक्षण करण्याकरिता अधिकारी वर्गाला प्रशिक्षण देण्यात यावे. या प्रशिक्षित अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे, अशा सूचना त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

हे शासन बळीराजाचे असून शेतकऱ्यांना आवश्यक असणाऱ्या सोयीसुविधा शासनाकडून पुरविण्यात येतात. प्रत्येक अधिकाऱ्यांनी मनापासून काम केल्यास आपण शेतकऱ्यांना सक्षम बनवू शकतो. खरीप पीक हंगामासाठी शेतकऱ्यांना कर्जपुरवठा सुरळीत झाला पाहिजे. एकही शेतकरी पीक कर्जापासून वंचित राहणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. पीक कर्जाचे देण्यात आलेले उद्दिष्ट पूर्ण करा. शेतकऱ्यांना पीक विम्याची समस्या जाणवते. पीक विमा योजनेचा शेतकऱ्यांना फायदा होण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेने लक्ष देण्याची गरज आहे.

तसेच शेतकऱ्यांना नवीन नवीन पिके घेण्यासाठी प्रोत्साहन देण्यात यावे. हळदी पीक घेण्यात यावे व हळदीचे क्षेत्र वाढविण्यासाठी सामूहिक प्रयत्न करावेत, अशा सूचनाही मंत्री गोगावले यांनी दिल्या. बैठकीच्या सुरुवातीला जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी खरीप हंगामपूर्व तयारी व नियोजनाचा आढावा सादर केला. यावेळी जिल्ह्यातील नावीन्यपूर्ण उपक्रम राबविलेल्या शेतकऱ्यांना बियांण्याचे तसेच उत्कृष्ट काम केलेल्या कृषी अधिकाऱ्यांचा मान्यवरांचा हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या माहिती पुस्तिकांचे मान्यवरांच्या हस्ते विमोचनही करण्यात आले.

# आदिशक्ती अभियानात वाडगाव ग्रामपंचायतीची राज्यस्तरीय झेप

**रेवदंडा : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या "आदिशक्ती अभियान" अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत वाडगाव, ता. अलिबाग यांनी उल्लेखनीय कामगिरी करत तालुका स्तरीय तसेच जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यशानंतर दि. ७ मे २०२६ रोजी राज्यस्तरीय समितीने वाडगांव ग्रामपंचायतीला भेट देत विविध उपक्रमांचे परीक्षण केले.

यावेळी कोकण विभागाच्या विभागीय उपआयुक्त सुवर्णा पवार मॅडम तसेच परिविक्षा अधिकारी ओव्हाळ मॅडम यांनी ग्रामपंचायतीच्या कार्याचा आढावा घेतला. महिला व बाल विकास विभाग, ग्रामविकास, शिक्षण व महिला सक्षमीकरणाशी संबंधित विविध योजनांची माहिती घेऊन समितीने समाधान व्यक्त केले.

या प्रसंगी महिला व बाल विकास अधिकारी रायगड कुचिक मॅडम, पंचायत समिती अलिबाग सभापती भाग्यता पाटील मॅडम, गटविकास अधिकारी शर्मिला पाटील मॅडम, पंचायत समिती सदस्य समाधान वार्डे उपस्थित होते.

तसेच ग्रामपंचायत वाडगांवच्या सरपंच सौ. सारिका गणेश पवार, उपसरपंच जयेंद्र काशिनाथ भगत, ग्रामपंचायत सदस्य सरिता जयेंद्र भगत, निलम नरेश थळे, रुपाली प्रसाद पाटील, शुभांगी मंगेश भगत, सजना नाईक, संतोष यशवंत बोले, प्रसाद पाटील, पोलीस पाटील नथुराम गणपत म्हात्रे, ग्रामपंचायत अधिकारी रिना वर्तक यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी प्राथमिक शाळा वाडगावच्या मुख्याध्यापिका सुगंधा पाटील, आशासेविका राखी राजेंद्र घाटकर, अंगणवाडी मदतनीस रिदिमा राजेश बोले यांनीही सहभाग घेतला.

ग्रामस्थांच्या सहकार्याने व शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी केल्यामुळे वाडगाव ग्रामपंचायतीने हे यश संपादन केले. राज्यस्तरीय पुरस्कारही ग्रामपंचायतीला मिळावा, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.




# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात

**माणगाव : बातमीदार**

माणगाव मंडळमध्ये ८ मे रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर माणगाव तहसील कार्यालय येथे आयोजित करण्यात आले होते. या शिबिरामध्ये विविध प्रकारचे स्टॉल लावण्यात आले होते. यावेळी विविध प्रकारचे दाखले वाटण्यात आले.

शिबिराला माणगाव तहसीलदार विपिन लोकरे, नायब तहसीलदार अरविंद घेमुड, निवडणूक नायब तहसीलदार सुधीर यादव, सीडीपीओ बिर्जे मॅडम, माणगाव मुख्याधिकारी संतोष माळी, भूमी अभिलेख उपाधीक्षक गणेश सोनार, नायब तहसीलदार पुरवठा शाखा राहुल शितोळे, माणगाव तालुका आरोग्य अधिकारी डॉ. दीपाली पुरी, आरोग्य अधिकारी डॉ. सुशील भातमकर, माणगाव मंडळ अधिकारी अर्जुन जमखंडी, ग्राम महसूल अधिकारी माणगाव प्रियांका सतेरे उतेखोल, सुरज पुरोहित, बामणोली तेजस्वी मिंड, होडगाव अविनाश उबाळे, पळसगाव बुद्रुक शुभांगी कमलाकर, सुरव तर्फे तळे प्रतीक्षा डामसे, सहाय्यक महसूल अधिकारी, महसूल सेवक यावेळी उपस्थित होते.



प्रमुख मान्यवरांच्या हस्ते आलेल्या लाभार्थ्यांना एकूण १८७ दाखले वाटप करण्यात आले. त्यामध्ये उत्पन्नाचे दाखले २५, रेशन कार्ड १०, संजय गांधी निराधार योजना १७, जन्म-मृत्यू नोंद ३ तसेच राज्य पुरस्कृत कृषी यांत्रिकीकरण योजना १, वारस नोंद ७, जातीचे दाखले ९०, रहिवासी प्रमाणपत्र १ आदींचा समावेश होता.

## नांदगाव हायस्कूलचा ९८.६०% निकाल

**मुरूड :** श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंतनगर नांदगाव हायस्कूलमधील इयत्ता दहावीचा निकाल ९८.६० टक्के लागला. १४३ पैकी १४१ विद्यार्थी पास झाले. अदिती कुमरोटकरने ८९.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला, तर संस्कृती मानाजीने ८८.२० टक्के गुण मिळवत द्वितीय क्रमांक आला. आदित्य कुलकर्णीने ८८ टक्के गुण मिळवत तृतीय, संस्कृती मिठागरीने ८७ टक्के गुण मिळवून चतुर्थ क्रमांक मिळवला. सलोनी माळीने ८६.४० टक्के गुण मिळवत पाचवा क्रमांक मिळवला. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन शाळेचे चेअरमन फैरोज घलटे तसेच सर्व संचालक व मुख्याध्यापिक अर्चना खोत, पर्यवेक्षक प्रतीक पेडणेकर व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी वृंदाकडून करण्यात आले आहे.

# पालीतील शिवसेना संपर्क कार्यालय जनतेचे प्रश्न सोडवून पक्षविस्ताराला गती देईल -आमदार महेंद्र दळवी

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील सर्वसामान्य जनता व शिवसैनिकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आणि पक्षविस्ताराला गती देण्यासाठी शिवसेना जनसंपर्क कार्यालय अतिशय उपयुक्त ठरणार असल्याचा विश्वास अलिबाग मुरुड मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांनी व्यक्त केला. आमदार दळवी यांच्या शुभहस्ते पाली येथे शिवसेना जनसंपर्क कार्यालयाचे शानदार उद्घाटन करण्यात आले. यावेळी पार पडलेल्या या सोहळ्यामुळे सुधागड तालुक्यात शिवसैनिकांमध्ये नवचैतन्य पसरले आहे. जनतेत जा, जनतेची कामे करा, पक्ष वाढवा, असा सल्ला आमदार दळवी यांनी यावेळी दिला.



हे कार्यालय पाली येथील अपोलो टायर्स व शेळके कन्स्ट्रक्शनच्या शेजारी सुरू करण्यात आले असून आता स्थानिक जनतेला आपल्या तक्रारी आणि समस्या मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.तसेच यावेळी सुधागड तालुक्यासह पाली शहरातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांची आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते नियुक्ती करण्यात आली. पाली सुधागडसह जिल्ह्यात शिवसेनेने नुकत्याच झालेल्या पंचायत समिती व जिल्हा परिषद निवडणुकीत आपला करिष्मा दाखवला होता. आता पक्षसंघटना मजबूत व बलाढ्य करण्यावर नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी लक्ष केंद्रित केले आहे. यातूनच हे कार्यालय उघडण्यात आले असून हे कार्यालय सर्वसामान्य जनतेचे प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी उपयुक्त ठरणार असल्याचे सांगण्यात आले.

यावेळी शिवसेना रायगड जिल्हाप्रमुख राजा केणी, शिवसेनेचे नेते आप्पा गोंधळी, शिवसेना युवा रायगड जिल्हा प्रमुख संजय म्हात्रे, मिलिंद पाटील, जिल्हा समन्वयक संजय राऊत, शिवसेना सुधागड तालुकाप्रमुख अनुपम कुलकर्णी, सुधागड तालुका संपर्कप्रमुख सूरज शेळके, जिल्हा परिषद सदस्या शर्मिला बोडके, रूपेश पाटील, शिवसेनेचे राजेश परदेशी आदींसह पाली शहरासह सुधागड तालुक्यातील शिवसेनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गारमाळमध्ये माळरान परिसरात टाकला जातोय कचरा; घाणीचे साम्राज्य

**खालापूर : प्रतिनिधी**

गारमाळ येथील हिरानंदानी यांची ग्रीन फिल्ड कंपनी कचरा माळरानावर टाकत असल्याने परिसरात घाणीचे साम्राज्य पसरले आहे.

घाटमाथ्यावर गारमाळ येथे हिरानंदानी यांची ग्रीन फिल्ड कंपनी असून येथे त्यांच्या जागेमध्ये बंगले बांधले आहे, मात्र या सर्व बंगल्यांमधील आणि हिरानंदानी कंपनी यांचा घणकचरा हे माळरानावर उघड्यावर टाकत आहे, गेल्या अनेक वर्षांपासून हा कचरा येथे टाकत असल्याने येथील शेतकऱ्यांची पाळीव जनावरे हा कचरा खाऊन त्यांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे, तर काही जनावरे दगावली आहेत. परिसरात मोठ्या प्रमाणात घाणीचे साम्राज्य पसरले आहे. यात प्लास्टिकच्या पिशव्या, दारूच्या बाटल्यांचाही समावेश आहे. गेल्या अनेक वर्षापासून गारमाळ येथे हिरानंदानी यांचा मोठा प्रकल्प येथे असून येथे अनेकांचे बंगले बांधण्याचे काम सुरु आहे. त्यामुळे या सर्व बंगल्यांमधील घनकचरा कंपनी गोळा करून माळरानावर टाकत असल्याचा अजब कारभार चव्हाट्यावर आला आहे. ही कंपनी अनेक वर्षांपासून येथे मनमानी कारभार करत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.



# सुके कोळंबी सोडे महागले!



**रेवदंडा : प्रतिनिधी**

कोकणातील पारंपरिक आणि खवय्यांच्या विशेष पसंतीचा पदार्थ असलेल्या सुके कोळंबी सोडे रस्स्याचे दर सध्या गगनाला भिडले आहेत. किलोमागे १८०० ते २००० रुपये असा भाव मिळत आहे. त्यामुळे सुके कोळंबी सोडे रस्सा आता फक्त श्रीमंतांसाठीच राहिला आहे, अशी प्रतिक्रिया सर्वसामान्य नागरिकांतून व्यक्त होत आहे.

रेवदंडा परिसरातील मच्छी मार्केटमध्ये सुके कोळंबी सोडे खरेदीसाठी स्थानिकांसह मुंबई, पुणे, ठाणे येथील चाकरमानी, पर्यटक व पै पाहुण्यांची मोठी गर्दी होत आहे. तिखट, झणझणीत मसाल्यात बनवलेला बटाटा घालून तयार केलेला सुके कोळंबी सोडे रस्सा हा अनेकांच्या खास आवडीचा पदार्थ मानला जातो. त्याच्या चविष्ट स्वादामुळे जेवताना चार घास अधिक खाल्ले जातात, असे खवय्ये सांगतात.

मोठ्या कोळंबीपासून तयार करण्यात येणारे सोडे बनवण्यासाठी कोळी बांधवांना विशेष मेहनत घ्यावी लागते. समुद्रातून मिळालेली मोठी कोळंबी स्वच्छ करून पारंपरिक पद्धतीने उन्हात सुकवून सोडे तयार केले जातात, मात्र बाजारात यांना मोठी मागणी आणि चांगला दर मिळत असल्याने अनेक मच्छी व्यावसायिक आता सुके कोळंबी सोडे तयार करण्याकडे अधिक लक्ष देत आहेत.

आग्राव, थेरोंडा, कोर्लई परिसरातील सुकी मच्छी व्यावसायिकांनी सांगितले की, दर वाढूनही सुके कोळंबी सोडे खरेदीची मागणी कमी झाली नाही. सणासुदीला व सुट्टीच्या हंगामात पर्यटकांकडून मोठ्या प्रमाणात खरेदी होत असल्याने बाजारात सुके कोळंबी सोड्यांना चांगला उठाव मिळत आहे.

# 'छत्रपती शिवाजी महाराजांना अभिप्रेत असलेल्या शेतकरी आणि सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या योजना राबवण्यात शासन आग्रही'

**चौक : प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराज यांना अभिप्रेत असलेल्या शेतकरी आणि सर्व सामान्य जनतेच्या हिताच्या योजना शासन राबवीत असून त्याचा लाभ सर्व सामान्य जनतेला होत आहे, हेच खरे समाधान असून याचे श्रेय या योजना राबविणाऱ्या सर्व यंत्रणांचे आहे असे उदगार खोपोली नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे यांनी काढले.

राज्य सरकारने आयोजित केलेल्या महाराजस्व समाधान शिबिर अभियान ची त्वरीत अंमलबजावणी करणे करता खोपोली महसूल मंडळ अधिकारी भरत सावंत व त्यांचे सर्व ग्राम महसूल अधिकारी यांनी महाराजा सभागृहात आयोजित केलेल्या छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरात विविध प्रकारचे दाखले वाटप व शासकीय योजना माहिती कार्यक्रमात बोलत होते.



तत्पूर्वी कार्यक्रमाचे उद्घाटन तहसीलदार अभय चव्हाण, उप नगराध्यक्ष विक्रम साबळे, माजी नगराध्यक्ष सुनील पाटील, नगरसेवक राहुल गायकवाड, अनिल सानप यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून केले, मंडळ अधिकारी भरत सावंत यांनी प्रास्ताविक भाषणात समाधान शिबिराचे महत्व आणि त्याचा लाभ या विषयी माहिती दिली.या समाधान शिबिरात प्रशासकीय विभागाकडील अधिकारी यांनी आपापल्या विभागाकडील योजनांची माहिती सदर अभियानात दिली. प्रत्येक विभागाने स्टॉल लावून शासनाच्या विविध प्रकारचे दाखले व योजना नागरिकांना लाभ देण्याकरिता सोय उपलब्ध करून देण्यात आली होती. वेगवेगळ्या लाभधारकांना त्या त्या योजनेचे अनुदान कागद पत्र देण्यात आले. जातीचे प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र, रहिवाशी दाखला, शैक्षणिक योजना व त्याचे दाखले,

प्रलंबित असलेले फेरफार निकाली काढणे, ७/१२ मधील चुकांची दुरुस्ती, डिजिटल स्वाक्षरीचे सातबार वाटप, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, अकृषिक तरतुदींबाबत मार्गदर्शन आणि सुधारणा (४२ ते ४७) कलम सनद प्रक्रियेची माहिती, सामाजिक अर्थसहाय्य योजना लाभ मंजुरी, तुकडेबंदी कायदा सुधारणा, पानंद रस्ता, सर्वांसाठी घरे पट्टेवाटप, ॲग्रीस्टॅग नोंदणी, पी. एम. किसान नोंदणी, कमी जास्त पत्रक दप्तर अद्यावत करणे. संपर्क आणि प्रात्यक्षिक उपक्रम राबविण्यात आले व माहिती देण्यात आली. सदर कार्यक्रमाला उपअधीक्षक भूमी अभिलेखचे जरड, उत्तम केंद्रे यांच्यासह लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

दरम्यान, ग्राम महसूल अधिकारी भूमिका लदगे, दत्ता करचे, वैशाली बावा, रणजीत कवडे, गणेश कोकाटे यांनी हे समाधान शिबिर यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले.

# लखनऊचा बंगळुरूवर विजय

## मिचेल मार्शचे वादळी शतक

**लखनऊ : वृत्तसंस्था**

मिचेल मार्शच्या विक्रमी शतकी खेळीनंतर प्रिन्स यादवच्या भेदक माऱ्यासह मोक्याच्या क्षणी दिग्वेश राठीने केलेल्या उत्तम गोलंदाजीच्या जोरावर लखनऊ सुपर जाएंट्सच्या संघाने घरच्या मैदानात नऊ धावांनी विजय नोदवला. गत चॅम्पियन रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला रोखत लखनऊने स्पर्धेतील आपले आव्हान जर-तरच्या समीकरणासह अजूनही कायम ठेवले आहे.



अखेरच्या षटकात २० धावांचा बचाव करताना कर्णधार ऋषभ पंतने दिग्वेश राठीकडे चेंडू सोपवला. रोमारियो शेफर्डसारखा धोकादायक फलंदाज समोर असतानाही या फिरकीपटूने केवळ १० धावा देत संघाचा विजय निश्चित केला.

पहिल्यांदा फलंदाजी करताना मिचेल मार्श आणि अर्शिन कुलकर्णी या जोडीने लखनऊ सुपर जाएंट्सच्या डावाची सुरुवात केली. या जोडीने पहिल्या विकेटसाठी ९५ धावांची भागीदारी रचली. अर्शिन कुलकर्णी २४ चेंडूत १७ धावा करून बाद झाला. दुसऱ्या बाजूला मिचेल मार्शने ५६ चेंडूत नऊ चौकार आणि नऊ षटकारांच्या मदतीने १११ धावांची विक्रमी शतकी खेळीसह संघाला मजबूत स्थितीत नेले. निकोलस पूरन याने २३ चेंडूत चार चौकार आणि एका षटकाराच्या मदतीने ३८ धावांची उपयुक्त खेळी केल्यावर अखेरच्या षटकात पंतने १० चेंडूत चार चौकार आणि दोन षटकारांच्या मदतीने ३२०च्या स्ट्राइक रेटसह नाबाद ३२ धावांची खेळीसह १९ षटकांत धावफलकावर तीन विकेट्सच्या मोबदल्यात २०९ धावा लावल्या होत्या. आरसीबीच्या संघाकडून जोश हेजलवूड, क्रुणाल पांड्या आणि रसिख सलाम यांनी प्रत्येकी प्रत्येकी विकेट घेतली.

पावसाच्या व्यत्ययामुळे प्रत्येकी १९-१९ षटकांच्या सामन्यात डकवर्थ लुईस नियमानुसार बंगळुरूच्या संघाला २१३ धावांचे लक्ष्य मिळाले होते. या धावसंख्येचा पाठलाग करताना मोहम्मद शमीने जेकब बेथल याला पहिल्याच षटकात चार धावांवर माघारी धाडले. दुसऱ्या षटकात प्रिन्स यादवने विराट कोहलीला खाते न उघडता देता तंबूत धाडले. या दोन षटकात आरसीबीचा संघ बॅकफूटवर ढकलला गेला.

सलामीवीर स्वस्तात माघारी फिरल्यावर देवदत्त पडिक्कल आणि कर्णधार रजत पाटीदार जोडी जमली. दोघांनी तिसऱ्या विकेटसाठी ५३ चेंडूत ९५ धावांची भागीदारी रचत संघाचा डाव सावरला. आरसीबीच्या डावातील ११व्या षटकात प्रिन्स यादव पुन्हा पिक्चरमध्ये आला. त्याने सेट झालेल्या देवदत्त पडीक्कल याला २५ चेंडूत ३५ धावांवर बाद केले. याच षटकात जितेश शर्माच्या रूपात त्याने संघाला आणखी एक यश मिळवून दिले. अर्धशतकी खेळी करणाऱ्या पाटीदारच्या ३१ चेंडूतील ६१ धावांच्या खेळीला शाहबाझ अहमदने ब्रेक लावला. एवढेच नाही तर १७ चेंडूत ४० धावा करणाऱ्या टीम डेविडची महत्त्वपूर्ण विकेट घेत या फिरकीपटूने सामना लखनऊच्या बाजूने फिरवला. अखेरच्या षटकात क्रुणाल पांड्या २८ (१६) आणि रोमारियो शेफर्ड २३ (१५) जोडीने सामन्यात ट्विस्ट आणला, पण शेवटच्या षटकात २० धावा करण्यात ते कमी पडले.

# 'प्रिन्स'ने घेतली 'किंग'ची विकेट!

## आयपीएलमध्ये नऊ वर्षांनंतर विराट शून्यावर बाद

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलमध्ये तुफान फॉर्मात असलेला रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा स्टार फलंदाज विराट कोहली लखनऊ सुपर जाएंट्सच्या सामन्यात शून्यावर बाद झाला. लखनऊचा युवा गोलंदाज प्रिन्स यादवच्या एका अप्रतिम चेंडूने कोहलीला बोल्ड केले आणि संपूर्ण स्टेडियममध्ये शांतता पसरवली.



विराट कोहलीला क्रिकेट विश्वात चेस मास्टर म्हणून ओळखले जाते, मात्र या सामन्यात २०१७नंतर धावांचा पाठलाग करताना पहिल्यांदाच विराट शून्यावर बाद होऊन पव्हेलियनमध्ये परतला.

लखनऊने दिलेल्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या आरसीबीला दुसऱ्याच षटकात विराट कोहलीच्या रूपात मोठा धक्का बसला. लखनऊचा गोलंदाज प्रिन्स यादवने टाकलेल्या दुसऱ्या षटकातील दुसऱ्या चेंडूचा अंदाज घेण्यात कोहली पूर्णपणे चुकला. १४०.४ किमी प्रति तास या वेगाने आलेल्या शार्प इनस्विंगर चेंडूने थेट कोहलीच्या ऑफ-स्टंप उडवला. विशेष म्हणजे, २०१६च्या आयपीएल हंगामात धवल कुलकर्णीनंतर कोहलीला शून्यावर आउट करणारा प्रिन्स हा आयपीएल इतिहासातील केवळ दुसराच गोलंदाज ठरला आहे. या हंगामात धावांचा पाऊस पाडणाऱ्या कोहलीसाठी हा सामना वैयक्तिकरीत्या निराशाजनक ठरला असला, तरी प्रिन्स यादव या युवा गोलंदाजाच्या कामगिरीने क्रिकेट वर्तुळात सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

# दिग्वेशने अखेर फिरवला सामना!



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लखनऊ सुपर जाएंट्सचे अखेर नशीब फळफळले आणि संघाने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा पराभव करत एका महिन्यानंतर आयपीएल २०२६मध्ये सामना जिंकला आहे. लखनऊचा कर्णधार ऋषभ पंतने गेल्या सामन्यातील पराभवानंतर सामना जिंकण्यासाठी नशीबाची गरज असते, असे म्हटले होते. त्यानुसार लखनऊच्या बाजूने गुरुवारी नशीब असल्याने संघाने कमालीच्या सांघिक कामगिरीसह सामना जिंकला.

अखेरच्या षटकात २० धावांची गरज असताना लखनऊ संघाच्या दिग्वेश राठीने कमालीचे अखेर षटक टाकले. पहिल्या चेंडूवर लेग बायमुळे एक धाव मिळाली. यानंतर दुसऱ्या चेंडूवर कृणाल पंड्याने एक धाव घेतली. दिग्वेशने तिसरा चेंडू गुगली टाकला आणि शेफर्ड चेंडू खेळायला चुकला व डॉट राहिला. यानंतर चौथा चेंडू वाईड पडला, त्यानंतर ऋषभ पंतने त्याच्याशी चर्चा केली. चौथ्या लीगल चेंडूवर शेफर्डने चौकार मारला, तर पाचव्या चेंडूवर मोठा फटका खेळण्यासाठी शेफर्डने चेंडू उचलला, पण चेंडू बॅटवर नीट न आल्याने सीमारेषेच्या आत चेंडू पडला. अखेरच्या चेंडूवर एक धाव घेतल्याने आरसीबीने नऊ धावांनी सामना गमावला.

डीएलएल पद्धतीनुसार लखनऊने २०९ धावांचा डोंगर उभारल्यानंतर आरसीबीला विजयासाठी २१३ धावांचे आव्हान देण्यात आले. ते सहा बाद २०९ धावाच करू शकले. दरम्यान, या पराभवासह आरसीबीची टेबल टॉपर होत प्ले ऑफच्या दिशेने मोठे पाऊल टाकण्याची संधी हुकली आहे.

# शतकवीर मार्शने पंतला टाकले मागे

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लखनऊच्या एकाना क्रिकेट स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्धच्या सामन्यात लखनऊ सुपर जाएंट्सचा सलामीवीर मिचेल मार्शची धमाकेदार खेळी पहायला मिळाली. अर्शिन कुलकर्णीच्या साथीने लखनऊच्या डावाची सुरुवात करणाऱ्या मिचेलने फक्त २० चेंडूत अर्धशतक साजरे केले. पावसामुळे खेळात व्यत्यय येत असताना त्याने आपल्या खेळीतील धमाका कायम ठेवत शतकी खेळीसह मोठा डाव साधला.



आरसीबीच्या गोलंदाजांची धुलाई करताना मार्शने अवघ्या ४९ चेंडूत आयपीएल कारकिर्दीतील आपले दुसरे शतक झळकावले. लखनऊ सुपर जाएंट्सच्या संघाकडून कोणत्याही फलंदाजाने केलेली ही सर्वात जलद शतकी खेळी ठरली. याआधी २०२५च्या हंगामात मिचेल मार्शने गुजरातविरुद्धच्या सामन्यात ६४ चेंडूत शतक साजरे केले होते.

लखनऊ संघाकडून याआधी सर्वात जलद शतकी खेळीचा विक्रम हा ऋषभ पंतच्या नावे होता. पंतने गत हंगामात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध ५४ चेंडूत शतक झळकावले होते. हा विक्रम मोडीत काढत लखनऊकडून सर्वात जलद शतक झळकवणाऱ्या फलंदाजांच्या यादीत मिचेल मार्श अव्वलस्थानी पोहचला आहे. हा डाव साधताना त्याने लोकेश राहुल आणि मार्कस स्टॉयनिस यांनाही मागे टाकले.

# स्विंग मास्टर भुवनेश्वर कुमारचे अनोखे द्विशतक

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताचा अनुभवी गोलंदाज भुवनेश्वर कुमार याने आयपीएल २०२६ स्पर्धेतील ५०व्या सामन्यात मैदानात उतरताच 'द्विशतकी' डाव साधत नवा इतिहास रचला आहे.



लखनऊच्या इकाना स्टेडियमवर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि लखनऊ सुपर जाएंट्स यांच्यात सामना रंगल्याचे पहायला मिळाले. हा सामना भुवीसाठी खास ठरला, कारण आयपीएलमध्ये २००वा सामना खेळण्यासाठी तो मैदानात उतरला. यासह आयपीएलच्या इतिहासात २०० सामने खेळणारा तो पहिला जलदगती गोलंदाज ठरला. आयपीएलमध्ये २०० सामने खेळणारा तो १२वा खेळाडू आहे. जगातील सर्वात मोठ्या स्पर्धेत सर्वाधिक सामने खेळण्याचा विक्रम हा महेंद्रसिंह धोनीच्या नावे आहे. त्याने आपल्या आतापर्यंतच्या कारकिर्दीत २७८ सामने खेळले आहेत. त्यापाठोपाठ रोहित शर्मा २७७ सामन्यासह दुसऱ्या स्थानावर आहे.

# सूर्यकुमार यादवला कर्णधारपदावरून मिळणार डच्चू?

## टी-२०मध्ये श्रेयस अय्यर भारताचा नवा कप्तान बनण्याची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतात झालेल्या आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील अंतिम सामन्यात न्यूझीलंडला पराभूत करून यजमानांनी सलग दुसऱ्यांदा जेतेपदाचा मान पटकावला. यावेळी सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळताना भारताने जेतेपदाची ट्रॉफी उंचावली, पण आता त्याचे कर्णधारपद जाऊ शकते. त्याचा सध्याचा फॉर्म पाहता, निवडकर्ते त्याला कर्णधारपदावरून काढू शकतात. त्याच्या जागी श्रेयस अय्यरकडे टी-२० संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सोपवली जाण्याची शक्यता आहे.





वृत्तानुसार भारतीय संघात बदल पहायला मिळू शकतात. आयपीएल २०२६ स्पर्धेनंतर जेव्हा निवडकर्त्यांची बैठक होईल, तेव्हा सूर्यकुमार यादवबाबत मोठा निर्णय घेतला जाऊ शकतो. टी-२० संघाच्या कर्णधारपदाची जबाबदारी श्रेयस अय्यरकडे सोपवली जाऊ शकते.

सूर्यकुमार यादवची लागोपाठ फ्लॉप कामगिरी पाहता निवडकर्त्यांचे टेन्शन वाढलं आहे. येत्या काही दिवसात नवीन टी -२० सायकल सुरू होणार आहे. त्यामुळे निवडकर्त्यांना आता बदल हवे आहेत. भारतीय संघ नव्या टी -२० सायकलची सुरुवात आयर्लंडविरुद्ध होणाऱ्या सामन्याने करणार आहे. या दौऱ्यासाठी श्रेयस अय्यरला संघात स्थान दिले जाऊ शकते. यासह त्याच्याकडे कर्णधारपदाची जबाबदारीदेखील सोपवली जाऊ शकते. भारतीय संघ सध्या २०२८ टी-२० वर्ल्डकप आणि ऑलिम्पिक २०२८ स्पर्धेच्या दृष्टीने संघबांधणी करण्याच्या प्रयत्नात आहे.

सूर्यकुमार यादवने कर्णधार म्हणून दमदार कामगिरी केली आहे. त्याच्या नेतृत्वाखाली खेळताना भारतीय संघाने अनेक महत्वाच्या मालिका जिंकल्या आहेत, पण फलंदाज म्हणून तो पूर्णपणे फ्लॉप ठरला आहे. टी-२० वर्ल्डकप स्पर्धेतही तो धावा करू शकला नव्हता. आता आयपीएल २०२६ स्पर्धेतही त्याची बॅट शांत राहिली आहे. त्याचे कर्णधारपद जाणार हे तर निश्चित आहे.

दुसरीकडे श्रेयस अय्यर गेल्या काही महिन्यांपासून भारतीय संघातून बाहेर आहे. आता त्याला संघात स्थान दिले जाऊ शकते, तो कर्णधार म्हणून संघात एंट्री करू शकतो. यामागचे कारण त्याची आयपीएल स्पर्धेतील कामगिरी आहे. त्याने कोलकाता नाईट रायडर्स संघाला जेतेपदाची ट्रॉफी जिंकून दिली होती. त्यानंतर गेल्या हंगामात पंजाबला अंतिम फेरीत पोहचवले. या हंगामातही पंजाबचा संघ अंतिम फेरीत पोहचू शकतो. यासह त्याने फलंदाजीतही योगदान दिले आहे.








**पनवेल : थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांच्या ३८व्या पुण्यतिथीनिमित्ताने जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शैक्षणिक, क्रीडा व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या संस्था आणि व्यक्तींचा गुणगौरव, नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींचा सत्कार तसेच पनवेल तालुकास्तरीय "स्व. जनार्दन भगत स्वच्छ ग्रामपंचायत पुरस्कार स्पर्धा २०२६" पारितोषिक वितरण समारंभ गुरुवारी सायंकाळी उलवे नोडमधील रामशेठ ठाकूर मैदानावर झाला.**



# महाराष्ट्र टेनिस क्रिकेट चॅम्पियन्स लीगचा शुभारंभ

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील एमसीए क्लब, बीकेसी येथे महाराष्ट्र टेनिस क्रिकेट चॅम्पियन्स लीग (एमटीसीसीएल)चा भव्य शुभारंभ पार पडला. या सोहळ्याला भारताचे माजी क्रिकेटपटू सुनील गावसकर, करसन घावरी आणि अमोल मजूमदार यांसारख्या मान्यवरांची उपस्थिती लक्षवेधी ठरली.

एकनाथ सोलकर फाउंडेशन आणि रोज मर्क लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या लीगमध्ये महाराष्ट्रातील पहिल्या प्रीमियर टेनिस क्रिकेट लीग अंतर्गत आठ संघांचा समावेश असणार आहे. आतापर्यंत या संघांचे कर्णधार निश्चित झाले असून उर्वरित खेळाडूंची निवड आगामी दिवसांत लिलाव पद्धतीद्वारे करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमादरम्यान भारताच्या माजी क्रिकेटपटूंना सन्मानित करण्यात आले तसेच स्व. एकनाथ सोलकर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली.

# आयपीएलमध्ये आणखी कडक नियमावली

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलच्या झगमगत्या दुनियेत मैदानाबाहेर घडणाऱ्या घडामोडींनी आता एक वेगळेच वळण घेतले आहे. ग्लॅमर आणि क्रिकेटच्या या मेळ्यात खेळाडूंच्या खासगी आयुष्यातील काही गोष्टी थेट बीसीसीआयच्या रडारवर आल्या आहेत. सोशल मीडियावर व्हायरल होणारे रील्स आणि खेळाडूंच्या मैत्रिणींसोबतचे फोटो केवळ चर्चेचा विषय ठरले नाहीत, तर त्यातून सुरक्षेचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. विशेषतः काही अघोषित नात्यांमुळे आणि मैदानाबाहेरील वाढत्या हस्तक्षेपामुळे भारतीय क्रिकेट नियामक मंडळ म्हणजेच बीसीसीआय आता कमालीचे सतर्क झाले आहे.





मैदानावर फोर आणि सिक्सचा वर्षाव करणारे धुरंधर खेळाडू सध्या त्यांच्या पार्टनरमुळे चर्चेत आहेत. हार्दिक पांड्या आणि माहिका, अर्शदीप सिंह आणि सिमरन कौर, यशस्वी जायसवाल आणि हॅमिल्टन यांची नावे सध्या सोशल मीडियावर जोरात गाजत आहेत. इतकेच नाही तर अनेक खेळाडू आपल्या महिला मित्रांसोबत प्रवास करताना किंवा हॉटेलमध्ये थांबताना दिसत आहेत. यामध्ये चिंतेची बाब अशी की, यातील काही जणी सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर आहेत आणि त्या खेळाडूंच्या अगदी जवळच्या गराड्यात वावरताना दिसत आहेत. यामुळे खेळाडूंच्या सुरक्षेला आणि शिस्तीला तडा जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

बीसीसीआयला सर्वात मोठी भीती ही 'हनी ट्रॅप'ची वाटत आहे. जेव्हा या तथाकथित गर्लफ्रेंड्स खेळाडूंच्या खोल्यांपासून ते अगदी प्रवासादरम्यान आणि मैदानाच्या आसपास मुक्तपणे वावरताना दिसल्या, तेव्हा बोर्डाच्या अधिकारी सावध झाले. या सर्व प्रकाराला लगाम घालण्यासाठी बीसीसीआयने आता ७ पानांची कडक गाईडलाईन जारी केली आहे. यामध्ये हनी ट्रॅपचा धोका लक्षात घेऊन खेळाडूंसोबतच संघ मालकांवरही काही बंधने घालण्यात आली आहेत. आता हॉटेलच्या खोल्यांमध्ये कधीही सरप्राईज चेकिंग केली जाऊ शकते.

खेळाडूंच्या मॅनेजर्सना प्रत्येक हालचालींची नोंद ठेवावी लागणार आहे. इतकेच नाही तर परवानगीशिवाय कोणालाही खेळाडूच्या रूममध्ये एन्ट्री मिळणार नाही.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com